

# ीसाईलीला



किं. ५० पैसे १९६५

स्थापना १९१६




साईबाबांच्या
मूर्ती पूजेचीं भांडीं
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे

सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २ — टे. नं. २९६३१

श्री साईनाथ ग्रंथालय, शिरडी.



# श्री साई वाक्सुधा

साईबाबांची दृष्टि चौफेर असते; कोनाकोपऱ्यांत काळोखांत तुम्हीं कोणतीही गोष्ट केली तरी ती त्यांच्या नजरेस आल्याशिवाय रहात नाहीं. हा बोध आपल्या मनावर कायमचा ठसला पाहिजे. म्हणजे आपल्या हातून कोणतेंही अनुचित कृत्य घडणार नाहीं. सत्कृत्य हातून घडावें यासाठीं तुम्हीं नेहमी दक्षता बाळगाल. पापकर्म हातून घडूं नये यासाठीं जागृत साईबाबा आपल्या सान्निध्य सदासर्वकाळ आहेत हा बोध मनावर ठसला म्हणजे आणखी काय पाहिजे ?

— श्रीसाईसच्चरित्

---


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४२ वें ] जानेवारी १९६५ [ अंक १० वा

: संपादक :

श्री. बी. जी. पोतनीस

वार्षिक वर्गणी रु. ५ ( ट. ख. सह )

टे. नं. ६३३६१

: कार्यालय :

'साई निकेतन,' डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०, बी, दादर, मुंबई १४.

# प्रिय वाचक—

मनुष्य जन्म प्राप्त होणें ही खरोखर दुर्लभ व फार महत्वाची घटना आहे. परंतु हें महत्व अज्ञानामुळें आम्ही जाणूं शकत नाहीं ही दुर्दैवाची गोष्ट आहे नाहीं का ! ज्यानें मानव जन्माचें महत्व ओळखले व ते ओळखून या जन्माचा जो योग्य तो सदुपयोग करण्याच्या मार्गास लागला तो धन्य होय.

परंतु असें किती जणांच्या बाबतींत घडत असतें ? थोड्या ! बहुसंख्य लोक या मानव शरिराचा सुखोपभोगासाठीं चैनीसाठीं, व दुसऱ्यांस शक्य तेवढा उपद्रव देण्यासाठीं उपयोग करीत असतात ही किती खेदाची गोष्ट आहे !

मानव जन्म मिळाला ! त्याचा सदुपयोग कशारीतीनें करून घेतां येईल याचा आपण विचार केला पाहिजे. त्याची बरोबर आखणी केली पाहिजे. जो क्षण किंवा जो दिवस गेला तो परत येणार नाही. यासाठी प्रत्येक क्षण व प्रत्येक दिवस सत्कारणीं लावण्यासाठीं आपण मनोभावें झटले पाहिजे. कोणत्याही प्रकारच्या भोगांत सुख नाहीं. मग सुख कशांत आहे ? त्यागांत, दुसऱ्यासाठीं झटण्यात, दुसऱ्यांचें दुःख हलके करण्यांत व ज्यांच्याशीं म्हणून आपला कारणपरत्वे संबंध येईल त्यांच्याशीं प्रेमानें व बंधुभावानें वागण्यात. हा मनुष्य देह आपल्या वाट्यास आला तो कशासाठीं ! दुसऱ्यांच्या उपयोगी पडण्यासाठी हें आपण जाणलें पाहिजे.

हें शरीर तरी काय ? कायम टिकणारें आहे काय ? तें क्षणभंगूर आहे, तें कधीं दृष्टीआड होईल हें कोणालाही सांगतां येणार नाही. यासाठीं ज्याने जन्म दिला त्या जगन्नियंत्याचें सतत स्मरण केले पाहिजे. ही भगवंताची कृपा की त्याने मानव जन्म दिला त्या जन्मदात्याचें सतत मनन चिंतन आमच्याकडून घडावें. त्याचा विसर कधींही पडूं नये.

सर्व साधु संतानीं व देवादिकांनीं मनुष्य जन्माला फार मोठें महत्व दिलें आहे. प्राणिमात्राची उत्तरोत्तर प्रगति होत चालली आहे, तो एकेक पायरी वर चढत जात आहे. ही मानव जातीची पायरी अशी आहे कीं, या पायरीवर असून टोकून आपण शाश्वत कल्याण साधूं शकतो. किंवा अकल्याणही करून घेवूं शकतो.

प्रथम आपण सुविचारी बनलें पाहिजे. आम्हीं आमची विचारशक्ति सर्वस्वी गमावून बसलों आहोंत. आपल्या भवितव्यासंबंधीं विचारच करावयाचा नाहीं. वारा वाहील, जिकडे घेऊन जाईल तिकडे जावयाचें हें का जीवन झालें ! मला कुठें जायचें

आहे, कोणत्या मार्गानें जायचें आहे व त्यासाठी दैनंदिन जीवन कसें चालवायचें आहे याचा नकाशा आपल्या दृष्टी समोर सतत असला पाहिजे. त्याच्यावर नजर सतत खिळलेली असली पाहिजे.

आपण साधकाची भूमिका स्वीकारली पाहिजे. आपणाला काय साध्य करायचें आहे तें मनाशीं निश्चित ठरल्यानंतर त्यासाठीं जरूर ती साधना करण्याच्या मागें आपण सतत लागलें पाहिजे. आपलें जें साध्य आहे ते उगाच सहजासहजीं हातीं येणारे नाहीं. त्यासाटीं साधनेचा मार्ग स्वीकारला पाहिजे.

प्रत्येकानें प्रथम आपल्या स्वभावाचा अभ्यास केला पाहिजे. अगदीं कसोशीनें व कांटेकोरपणें केला पाहिजे. आपल्या स्वभावांत उणीवा कोणत्या आहेत, आपल्या स्वभावात स्वार्थाला, मत्सराला, मोहाला व दुर्गुणांना जागा किती आहे! त्यांना हरवायचें आहे, त्या दुर्गुणांच्या जागीं सद्गुणांची स्थापना आपणास करायची आहे, त्यासाठी झगडावें लागेल, निराशा पदरी पडेल, परंतु किती झगडावे लागले तरी अविरत झगडावयाचें, हार खावयाची नाहीं. निराशेच्या आहारी कधींही जावयाचें नाहीं. पूर्व काळीं आपल्याकडून जर काही दुराचार किंवा पापकर्म घडलें असेल तर त्याची खंत करीत बसावयाचें नाही. झालें गेलें तें कृष्णार्पण झालें! आता वैभवशाली नवा मार्ग चोखाळावयाचा. मनाच्या व्यापारावर सतत नजर ठेवायची प्रत्येक पाऊल जपून टाकावयाचे आणि झपाट्याने मार्ग काटावयाचा.

भगवंतावर संपूर्ण श्रद्धा पाहिजे. ती असली म्हणजे तुम्हीं निर्धास्थ रहावें. मग तुमची काळजी त्याला. तोच तुमचा भार वहाणारा व तुमचे मार्गदर्शन करणारा.

आजवर ज्यानीं भगवंतावर श्रद्धा ठेवली त्याना त्यानें कधींही अंतर दिलेले नाहीं. त्याच्यावर संपूर्ण श्रद्धा ठेवली असतां या जगांत काय घडणार नाहीं? त्यामुळें तुमच्या मनातील पापांचा सारा मळ साफ धुतला जातो. पापी विचारांना तेथें जागाच रहाणार नाहीं. इकडे तिकडे धावपळ करणारे तुमचें मन एकटा जागीं स्थीर होऊन तें शांत राहूं शकेल.

'मन चिंती तें वैरी न चिंती असें म्हटलें आहे. अशा या मनाला वेसण घालणें हें काम फार कठीण आहे. त्याला वेसण घालण्याचा मार्ग म्हणजे भगवंताचें श्रद्धापूर्वक स्मरण, चिंतन, मनन.

तुमची जात, गोत, धर्म, वर्ण कोणताही असो. तुम्हीं त्याला शरण गेलां म्हणजे पुण्यपावन झालांच पाहिजे. भगवंताच्या ठायीं जात, गोत, वर्ण, धर्म असले भेदाभेद मुळींच नाहींत. सारीं त्याची लेकरें. जे अनन्यभावें त्याला भजतात ते त्याच्याजवळ जातात.


देव भावाचा भुकेला आहे. जो कोणी—मग तो कोणीही असो—भक्तिभावानें मला पान, फूल, फळ किंवा कोणतीही वस्तू अर्पण करतो. त्याचा मीं स्वीकार करतो. मी निस्सीम

प्रेम पहातो. मी भुकेला आहे प्रेमाचा ! यासाठीं आम्ही जें जें कांहीं करूं तें तें देवाचें नाव घेऊन त्याच्यासाठीं करूं या. केलेलें प्रत्येक कर्म त्याला अर्पण करूं या. आमचें या जगांत काय आहे ? जें कांहीं आहे तें सारें त्याचें ! मग आम्हीं माझें माझें म्हणून प्रत्येक वस्तूला व व्यक्तिला कां म्हणून चिकटून रहावयाचें ? त्याचा मोह कां म्हणून बाळगायचा ?

आमचा जन्म सेवेसाठीं आहे. सुखोपभोगासाठीं नाहीं. स्वतःची, स्वतःच्या कुटुंबाची, समाजाची व ज्याच्या सान्निध्यांत आपण येऊं त्या सर्वांची सेवा करण्यासाठीं हा मानवजन्म आहे. मानवसेवा म्हणजेच, भगवंताची सेवा. ती करतां करतां आम्हाला या जगांतील शेवटचा श्वास घ्यावयाचा आहे.

पूज्य साईबाबांनीं आम्हाला हेंच शिकविलें. स्वतःच्या आचरणानें अखेरपर्यंत शिकविलें. त्या शिकवणुकीचा विसर आम्हांला कधींही न पडो. ध्रुवताऱ्याप्रमाणे बाबांची शिकवण सतत आमच्या दृष्टीपुढें राहो व त्याच प्रकाशात अखंड वावरण्याचें भाग्य आम्हाला लाभो, हेंच आमचें अनन्यभावें त्याच्यापाशीं मागणें.

—संपादक




## ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स

**३६३, मंगळदास मार्केटसमोर, मुंबई नं. २. टे. नं. २२८७४**

**तयार कपडे, सर्व प्रकारची होजियरी तसेंच टॉवेल्स, चादरी व पडद्यांचें कापड मिळण्याचें एकमेव ठिकाण. होलसेल व रीटेलर्स**

# श्रीरामकृष्ण व शारदादेवी

**श्रीरामकृष्ण परमहंस यांच्या सहधर्मचारिणी श्री शारदादेवी यांचे सारें जीवन सर्व दृष्टीनीं अलौकिक होतें. त्यांची एकशें-बारावी जन्मतिथी गेल्या आठवड्यांत ठिकठिकाणीं साजरी झाली त्यानिमित्तानें त्यांचा हा अल्प परिचय.**

" तूं इथं कशाला आली आहेस ? मायामोहांत मला ओढायचा का तुझा हेतु आहे ? " श्री रामकृष्णांनीं शारदादेवीला विचारलें.

" तसं कां बरं मी ओढीन ? आपल्या धर्मजीवनांत आपल्याला सहाय्यक व्हावं म्हणून आल्ये आहे मी ! आपली सेवा घडावी हाच हेतु. ती घडली म्हणजे सर्व कांहीं मला मिळाले. " श्री शारदादेवींनीं लगेच उत्तर दिलें.

शारदादेवींचें वय त्यावेळी अठरा एकोणीस वर्षांचें असेल नसेल. यौवनाच्या ऐन भरांत त्या होत्या. रम्य संसाराची सुखद स्वप्नचित्रें रेखाटण्यांत रंगून जावयाच्या त्या काळांत, तरुण स्त्रीच्या तोंडून असें उस्फूर्त उत्तर मिळणें किती आश्चर्यकारक श्री रामकृष्णांनाहि तसें उत्तर लगेच मिळेल असें वाटलें नव्हते.

त्यांचा चेहरा प्रफुल्लीत झाला. ते अंतर्यामी सुखावले. अशा सहचरीची जोड करून दिल्याबद्दल त्यांनीं जगन्मातेचे मनांतून अनंत आभार मानले.

" आपल्याला सहाय्यक व्हावं म्हणून आल्ये आहे मीं ! " हें उत्तर त्यांच्या कानांत किती वेळ तरी घुमत राहिलें. आणि त्यांतच त्यांची तंद्री लागली, प्रसन्नतेचे चांदणें त्यांच्या चेहऱ्यावर पसरलें होतें.

शारदादेवींचें मुखकमल उत्फुल्ल झालें. अवर्णनीय अशा आनंदाचा आपल्यावर वर्षाव होत आहे असें त्यांना वाटलें.

पतीच्या जीवनहेतूचा उलगडा त्यांना स्पष्टपणें झाला होता. त्या हेतुला पोषक असाच आपलाहि जीवनहेतु असला पाहिजे याची त्यांना पूर्णपणें जाणीव झाली होती. आपल्या असाधारण पतीला सोबत करावयाची, तर आपला आयुष्यक्रमहि सर्वसामान्य स्त्रीहून वेगळा पतीच्या आयुष्यक्रमाशी जुळणारा असला पाहिजे याचा उमज त्यांना पडला होता.

पतीच्या त्या महान् पारमार्थिक प्रवासांत त्या सामील झाल्या. अनेक दिव्यांतून त्यांना जावें लागलें. तलवारीच्या धारेवरचें तें चालणें होतें. पण त्याची फिकीर त्यांनीं केली नाहीं.

श्री रामकृष्णावर आतां दोन जबाबदाऱ्या येऊन पडल्या होत्या. पहिली, पत्नीच्या आध्यात्मिक शिक्षणाची व दुसरी, स्वतःची समदृष्टी अचल ठेवण्याची. पहिली तितकीशी कठीण नव्हती. पत्नीची मनोभूमि शुद्ध व उच्च संस्कारक्षम आहे हें त्यांनीं पारखलें होतें. विशेषतः समर्पण बुद्धीनें वागणाऱ्या पत्नीला स्वतःच्या विचार-सरणीप्रमाणें वळण लावणें दुर्घट नव्हतें. पण, जिचें यौवन भराला आलें आहे अशी मोहमूर्ति समोर असतां स्वतःची वृत्ति सम व स्थिर ठेवणें ही गोष्ट अत्यंत दुर्घट. 'आणि आतांपर्यंत जें प्रतिपादित आलों त्याची परिक्षा आतां व्हावयाची आहे. जगन्मातेनें कदाचित् हीच परीक्षा घेण्यासाठीं हें सारें घडवून आणलें असेल असें त्यांना वाटूं लागलें. 'जो खरोखरच ब्राह्मी स्थितीला पोंचला असेल, त्याला पत्नी ही कधींच विघ्न सारखी वाटणार नाहीं तशी ती वाटत असेल तर त्याची ती ब्राह्मी स्थिती तकलुपी आहे असें समजावें. ब्रह्मज्ञानासाठीं धडपड करणाऱ्यानें मानसिक पावित्र्य राखण्यासाठीं स्त्री-पुरुष भेद राखला तर तें कांहीं वावगें नव्हे. पण खरी ब्राह्मी स्थिति त्याच्यापासून दूरच असते. पण जो त्या स्थितीला पोंचला त्याच्यामध्यें हा भेदाभेद संभवतच नाहीं.'

श्री. रामकृष्ण हे क्रांतिप्रिय, प्रयोगशील वृत्तीचे पुरुष होते. त्यांना एखादी नवीन कल्पना सुचली कीं, तिचे प्रयोग करून पाहून त्याप्रमाणें वागण्यास ते कधीं मागें-पुढें पाहात नसत. आणि त्यामुळेंच परमार्थमार्गांत पडलेल्या इतर व्यक्तीप्रमाणें त्यांनीं आपल्यासमोर उभ्या राहिलेल्या पत्नीचा, वैराग्याचा बाऊ करून धिःकार केला नाहीं. त्यांनीं तिला आपल्यापाशीं राहूं दिलें, नव्हे तिचा तसा हक्कच आहे असें मानलें. तिला तिच्या मनाप्रमाणें आपल्याला सहाय्य करण्याची, आपली सर्व व्यवस्था ठेवण्याची पूर्णपणें मोकळीक दिली. इतकेंच काय, पण पहिले आठ महिने स्वतःच्या शेजारीं तिला निद्राहि घेऊं दिली. स्वतःची निष्ठा ते कसोटीला लावून पाहत होते.

एके रात्रीं शारदादेवी त्यांच्या शेजारीं शय्येवर निद्रित असतां ते उठून बसले आणि स्वतःशीं विचार करूं लागले. 'जग या शरीराला स्त्री म्हणून संबोधतें. तिला मिळविण्यासाठीं पुरुषाची केवढी धडपड. तिच्या उपभोगासाठीं काय काय प्रकार तो करीत असतो, कित्येकदां तो किती लाचार होतो! तिच्या लाभासाठीं करूं नयेत तीं कृत्यें तो करतो. अशा पुरुषाला परमात्मप्राप्ती कधींच होणें शक्य नाहीं. तर मग मना! अप्रामाणिक होऊं नकोस. आंत एक आणि बाहेर वेगळेंच भासवूं नकोस. मला सांग कीं, हा स्त्रीचें शरीर तुला पाहिजे कीं परमात्मा पाहिजे. पहिलें हवें असेल तर तें तुझ्या पुढ्यांत आहे, आपल्याकडे तें ओढून घेण्यास तूं पूर्णपणें मोकळा आहेस.' विचारांचें असें आंदोलन सुरू असतां शारदादेवींच्या शरीराला स्पर्श करण्याकरितां त्यांनीं हात पुढें केला. तो त्यांच्या मनानें अशी कांहीं उचल खाल्ली कीं, ते तात्काळ समाधिमग्न झाले. सबंध रात्र त्याच स्थितींत ते होते.

याच काळांत एकदां एकांतांत शारदादेवींनीं श्री रामकृष्णांना त्यांचे पाय चोळीत असतां विचारलें, "आपण मजकडे कोणत्या दृष्टीनें पाहतां ?" त्यांचेकडून लोगेच उत्तर आलें, "जी माता त्या पलीकडील मंदिरांत देवतारूपानें उभी आहे, मला जिनें जन्म दिला व जी समोरच्या नगारखान्यांत राहात असते, तीच येथें यावेळीं माझे पाय चोळीत बसलेली आहे. मूर्तिमंत मातृत्व तुझ्या रूपानें इथें वावरत आहे, अशी माझी भावना आहे. मातेचेंच तूं रूप आहेस. तुझ्याकडे पाहण्याची माझी दृष्टि ही अशी आहे." सर्वसामान्य संसारी माणसाच्या कानाला ही भाषा कशीशीच वाटेल. पण, श्री रामकृष्णांची ती नित्याची, खऱ्याखुऱ्या भावनेची निदर्शक होती. जगन्मातेचें ते उपासक होते. आपण तिचें बालक आहों असें ते मानीत. जगांतील साऱ्या स्त्रिया ही त्या जगन्मातेचींच रूपें त्यांना वाटत.

श्री रामकृष्णांच्या मुखांतील ते शब्द ऐकून शारदादेवी थक्क झाल्या. त्यांचे मस्तक आदरानें नम्र झालें. अंतरांत कांही तरी एक नवी जागृति होऊन, त्यांच्या चेहऱ्यावर मंद मधुर, शीतल असें तेज चमकलें. आपण कोण आणि आपलें आगमन कशासाठीं झाले आहे याचा स्पष्ट प्रकाश त्यांच्या चित्तांत पडला.

या प्रसंगानंतर त्यांचा जीवन सरिता संथपणें वाहूं लागली. स्तुतिवर्षावानें ती कधीं झळाळली नाहीं किंवा निंदेच्या खऱ्याळ वाऱ्यानी ती कधीं खळाळली नाहीं.

"जगन्मातेचेंच तूं रूप आहेस," हे श्री रामकृष्णांचे उद्गार किती सत्य आहेत याची प्रत्यक्ष प्रचीति शारदादेवींना लवकरच आली.

१८७२ सालच्या मे महिन्याची २५ वी तारीख होती ती. फलहारिणी कालिकेच्या पूजेचा तो दिवस होता. प्राण्यांच्या पूर्वकर्मांच्या परिणामांचें क्षालन व्हावें यासाठीं कालीमातेची मोठ्या समारंभानें या दिवशीं पूजा होत असते. दक्षिणेश्वर येथील मंदीरांत सेवकांची व भक्तमंडळीची एकच धांदल, गडबड उडाली होती. लतापताकांनीं, गुढ्या-तोरणांनीं, फल-पुष्पमालांनीं सभामंडप शोभिवंत केला जात होता. गाभाऱ्यांत पूजेची तयारी होत होती. देवडीवर सनईचौघड्याची धूम उठली होती. देवळाच्या आवारांत जिकडे पहावें तिकडे उल्हास भरून राहिला होता. कोणी भजनें म्हणत होते, कोणी एकतारीवर भावपूर्ण वैष्णवगीतें म्हणत नाचत होते, उत्सवाची धुंदी साऱ्यांनाच चढली होती.

श्री रामकृष्णानीं आपल्या खोलीचीं कवाडें आज बंद केली होती. त्यांच्या खोलींत पूजेची तयारी चालली होती. आज ते देवीची स्वहस्तें पूजा करणार होते.

रात्र पडली. नऊ वाजले. शारदादेवी कवाड उघडून आंत आल्या. कवाड बंद झालीं- पूजेला प्रारंभ झाला. खोलीच्या पश्चिमेकडील दरवाजाजवळ पूर्वाभिमुख होऊन श्री रामकृष्ण बसले. मंत्रोच्चारपूर्वक पूजासाहित्यावर जलसिंचन करून तें त्यांनीं शुद्ध

करून घेतलें. आणि पूजेची प्राथमिक तयारी होतांच देवतार्चनासाठीं मांडलेल्या चौरंगावर आसनस्थ होण्यास त्यांनीं शारदादेवींना सांगितलें. चौरंगावर मंत्रोच्चरपूर्वक आकृत्या काढल्या होत्या. शारदादेवी त्यावर बसल्या. मोहनास्त्राच्या अमलाखालीं असल्यासारख्या त्या वागत होत्या. श्री. रामकृष्णांनीं मंत्रानें पवित्र केलेल्या पाण्याचें त्यांजवर अनेक वेळां सिंचन करून पुढीलप्रमाणें आवाहन केलें: ' हे जगन्माते, हे सर्व शक्तींचे स्वामिनी, पूर्णत्वाचे कवाड माझ्यासाठीं उघड. तुझ्या आसनावर आरूढ झालेल्या या स्त्रीचा देह व तिचें मन पुनीत कर, आणि तिच्यांत तूं अवतरून तिच्या हस्तें जें जें कांहीं शुभ असेल तें तें घडीव. " नंतर न्यासपूर्वक शारदादेवींना कालीदेवीच्या जागीं कल्पून त्यांनीं त्यांची पूजा केली. तिचे चरण आपल्या मांडीवर भक्तिभावानें घेऊन अळित्यानें ते हलकेच रंगविले, त्यांचे कपाळीं कुंकू लावले, शारदादेवी अर्धजागृतींत अर्ध-सुषुप्तींत होत्या. आणि पूजा संपली तेव्हां त्यांची पूर्णपणें समाधि लागली होती, समोर बसलेल्या श्री रामकृष्णाचीही तीच अवस्था. भज्य आणि भजक या दोघांचेहि आत्मे एकमेकांत विलीन झाले होते. सत्-चित् आनंद स्वरुपांत दोघेंहि अष्टांग बुडाली होती.

पूजा आतां संपली होती. खोलीचीं कवाडे उघडली गेलीं. बाहेरील शीतल वायु आंत शिरला. शारदादेवी हळुहळु भानावर येऊं लागल्या. त्यांनीं डोळे उघडले. समोर मस्तक नत करून हात जोडून श्री रामकृष्ण बसलेले होते.

आज आध्यात्मिक पूर्णतेचा परमोच्च बिंदु श्री रामकृष्णांनी गांठला होता. त्यांची आयुष्यभराची साधना आज सफल झाली होती.

शारदादेवी–श्री शारदामाता, आतां जगाच्या माता बनल्या. श्री रामकृष्णांचा भक्तगण त्यांना यापुढें ' मा ' ' माताजी, ' म्हणून संबोधूं लागला. आणि त्याहि तीं आपलीं मुलें या भावनेनें त्यांच्याशीं समत्वानें, वात्सल्यानें वागूं लागल्या.

१८८६ सालची १५ वी तारीख. संध्याकाळची काळी छाया आकाशांत गडद गडद पसरत चालली होती. घरांघरांतून हळुहळु दिवे लागूं लागले होते. जिकडे तिकडे अगदीं निःस्तब्ध होतें. मधुनच एखाद वेळेस रातकिड्यांचा किर्र किर्र असा कर्णकटु आवाज उठे.

श्री. रामकृष्ण बिछान्यावर निपजित पडले होते. त्यांचें शरीर शुष्क झालें होतें. चेहऱ्यावर ग्लानि आलेली होती. ते अकस्मात् उग्दारले: ' श्वासोच्छवास करणें मला कठीण होत आहे. ' आणि ते एकदम समाधिमग्न झाले. या समाधीचें स्वरूप नेहमींहून वेगळें वाटूं लागलें. तें पाहून भोंवतालच्या शिष्यमंडळींपैकीं कांहींजण ओक्साबोक्शीं रडूं लागले. मध्यरात्रीनंतर श्री रामकृष्ण थोडेसे देहभानावर आले. ' भूक लागली आहे मला, ' ते म्हणाले. त्यावर त्यांना थोडीशी पेज पाजण्यांत आली. तेव-

त्यानें त्यांना जराशी हुशारी वाटलेली दिसली. डाव्या कुशीच्या बाजूस रचलेल्या उशांच्या ढिगारावर रेलून ते आपला लाडका शिष्य 'नोरन्' (स्वामी विवेकानन्द) याच्याशीं अगदीं खोल आवाजांत बोलूं लागले. अखेरचे, निरवानिरवीचें कार्य कसें चालू ठेवावयाचें यासंबंधींच्या सूचना ते त्यांना करीत होते. जें सांगायचें होतें तें सांगून होतांच त्यांनीं कालीमातेच्या नांवाचा त्रिवार उच्चार केला व हळूच बिछान्यावर आपलें अंग टाकलें. आणि ते महासमाधींत शिरले, तेथून ते परत आले नाहींत. या जगांतील त्यांचा रहिवास संपला होता.

श्री शारदादेवींच्या आयुष्यांतील एक महान् भागीदार, आध्यात्मिक जीवनांतील एक थोर मार्गदर्शक, मृत्तिकेचें सुवर्ण करणारा किमयागार दृष्टीआड झाला होता; अनेकांचें शांतिस्थान बनलेला एक विशाल वटवृक्ष उन्मळून पडला होता.

श्री शारदा माताजींच्या आयुष्यांतील एक पर्व आज संपलें होतें. नव्या पर्वांतील आयुष्यक्रम जुळवून घेण्याची तयारी करणें त्यांना प्राप्त होतें.

श्री रामकृष्णांचा देह अग्न्यर्पण केल्यावर माताजी लौकिक रूढीप्रमाणें आपला सौभाग्यालंकार अंगावरून उतरवूं लागल्या. तों काय चमत्कार! श्री रामकृष्ण समोर उभे. "काय करते आहेस तूं हे?" त्यांनीं विचारलें. "मी कुठं गेलेलों नाहीं. एका खोलींतून दुसऱ्या खोलींत गेलों आहे, इतकंच" ते म्हणाले. माताजी त्याचा अर्थ उमजल्या. त्यांच्या अंतःकरणांतील दुःख पुष्कळसें निवालें. त्यांनीं आपला सौभाग्यालंकार—कंकणें—उतरलीं नाहींत. आपले पती आपल्याजवळ आहेत अशीच दृढ भावना त्यांनीं ठेविली. पुष्कळ वर्षेंपर्यंत त्यांनीं आपल्या हातांत सौभाग्यदर्शक बांगड्या ठेविल्या होत्या. लाल किनारीची साडीहि त्या नेसत. उत्तरवयांत त्यांनीं त्या सर्वांचा त्याग केला.

श्री रामकृष्णांच्या महासमाधिनंतर चौतीस वर्षें शारदा माताजी या जगांत पार्थिव शरीरानें वावरल्या. या काळांत ज्या विशिष्ट कार्याकरितां त्यांच्या पतिदेवाचा अवतार होता, तें कार्य उत्तम तऱ्हेनें वाढीला लागून, त्यांच्या तत्त्वांचा प्रसार जगाच्या सर्व भागांत झालेला त्यांनीं पाहिला 'विश्वाचि माझे घर' असें मानणाऱ्या श्री रामकृष्णाचें पूजन, आशिया, युरोप व अमेरीका या तिन्ही खंडात त्यांच्या संन्यासी मुलांनीं श्री. रामकृष्णाच्या नांवानें मठ स्थापून वेदान्तधर्माची पताका उंच फडकवित ठेविलेली त्यांनीं पाहिली. धर्म, वर्ण, जाति यांच्या भेदाच्या भिंति कोसळून टाकून 'यारें यारें सारे जण, गुढी उभवू आनंदानं' असें म्हणून धर्मपंथातीत अशी श्री रामकृष्णधर्माची गुढी सर्व धर्मीयांना एकत्र आणून उभविली जात असल्याचें पाहून त्यांच्या नेत्रांचें पारणें फिटलें.

१९१८-१९ सालापासून त्यांच्यावर वार्धक्याच्या छाया दाट पसरूं लागल्या

होत्या. माहेरच्या प्रपंचांतून, तसेच इतर व्यवहारांतूनहि त्या लक्ष काढून घ्यावयाला लागल्या. सर्वांपासून पूर्णपणे अलिप्त राहण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू झाला. आणि अंतसमयाच्या आधीं कांहीं दिवस तर, अत्यंत जिव्हाळ्यानें जवळ केलेल्या नातेवाईकांनाहि त्यांनीं निर्धारपूर्वक दूर लोटलें. भोंवतालची मंडळी याचा अर्थ समजली महाप्रयाणाची ती तयारी होती.

१९२० सालच्या फेब्रुवारी महिन्यांत तापानें आजारी पडून त्या जयरामवटीहून कलकत्त्यास उद्बोधन मासिकाच्या इमारतींत राहावयास आल्या. त्यांचें शरीर कृश होऊन काळवंडले होते. या आजारांत त्या बिछान्याला कायमच्या खिळल्या. कोणतेहि वैद्यकीय इलाज उपयोगी पडले नाहीत. सहा महिने त्या बिछान्यात कष्टदायक देहभोग भोगून आणि २० जुलै १९२० रोजी पहाटे दीड वाजतां त्या श्री रामकृष्णांच्या चैतन्यांत लीन झाल्या.


त्यांचा देह मोठ्या सन्मानानें कलकत्त्याहून बेलूर येथें नेण्यांत येऊन, रामकृष्ण मठाच्या आवारांत गंगातीरावर अग्नीला अर्पण करण्यांत आला. याच पुण्यभूमीवर त्यांच्या नांवाचें एक छोटेंसें मंदिर आज उभें आहे.

श्री माताजींच्या संबंधीं श्री रामकृष्णदेव यांनीं म्हटलें आहे :

"ती ज्ञानस्वरूपी माता सरस्वतीचा अवतार आहे. जगाला ज्ञानाचा प्रकाश देण्यासाठी तिचें आगमन झालेलें आहे."

श्री माताजींचें आयुष्य इतकें साधें, सरळ आणि अवडंबररहित होतें कीं, त्यांच्या अलौट महात्म्याची ओळख कोणालाच होऊं शकली नाहीं. स्वामी विवेकानंद यांना हें महात्म्य ओळखण्याचें भाग्य लाभलें होतें. त्यांनीं म्हटले आहे.—

"तुम्हां कोणालाहि श्री माताजी—श्री शारदादेवी यांचें विस्मयकारक महात्म्य ओळखतां आलें नाहीं. पण तें लवकरच तुम्हांला कळून येईल. शक्तीविना जगताची पुनर्जागृति असंभवनीय असते. भारताच्या अधिष्ठानावर महाशक्तीची पुनर्स्थापना करण्यासाठीं श्री माताजींचा अवतार आहे. मैत्रेयी आणि गार्गी यांचें पुनरागमन या जगांत होणें अवश्य आहे."



# नामदेवांची वाणी

( अनुवादक : गणेश विष्णु कविटकर, एम्. ए. )

: ३९ :

## रामा हो, रामा, रामा हो रामा

प्रभु रामराया ! अहो रामराया !! अहो रामराया !!! या जगांत तुम्हीच माझे आहांत. हे रामराया ! तुम्हीच निश्चित माझे आहांत. मी नामदेव तुमच्या द्वारांतील नर्तकी असून तुमचे यश गातो, गुण—संकीर्तन करतो.

## संसाररूपी समुद्र

जों पर्यंत रामनामाचें प्रेम उत्पन्न होत नाहीं तोंपर्यंत माया मोहांत गुंतून सारा जन्म नष्ट होऊ राहिला. सारा जन्म घालविला तरी अंगाला लागलेला चिखल निघणार नाहीं; कारण हे कर्म कांहीं लोक चिखलानेंच तो चिखल काढूं इच्छीतात. अंतरंग काळे कुट्ट असले आणि बाहेरचे आवरण स्वच्छ असले तरी काय उपयोग व त्याला तुम्ही पाण्यानें किंवा मातीनें कितीहि धुतले तरी ते स्वच्छ कसें होणार ! नामदेव म्हणतात, संत साधु लोकच संसाररूपी समुद्राला पार करून नेऊं शकतात. अज्ञानी मनुष्याला विचारून हा संसाररूपी समुद्र कसा काय पार करणार ?

: ४१ :

## परिहारक धंधा करै सबै अकेला

दुःखाचा परिहार करण्यासाठी स्वतः सर्व त्याग करतो त्या प्रभुरायाला माझी चिंता. वैष्णव भक्तांचा परिवार ज्यांच्या भोंवती आहे तो प्रभु नारायण हे माझे माता आणि पिता आहेत. त्याच प्रभु केशवाच्या सानिध्यांत एका ठिकाणीं राहून नामदेवानें आपले स्वत्व अहंकार सोडून स्वतःला आत्यंतिक भक्तिभावानें त्याच्या स्वाधीन केले आहे—स्वतःला सोपवून दिले आहे.

: ४२ :

## ऐसी आरती तनमन गाये

प्रभु सारंग पाणीचा पळभरहि विसर न पडेल अशी तनमनानें त्याची आरती गाऊं. जो श्रीनरहरीचें गुणगान करतो तो जन्ममरणाच्या फेऱ्यांतून मुक्त होऊन वैकुंठांत वास करतो. नामदेव म्हणतात, त्याचे स्तुतिगान ज्यांनीं चांगले केले ते वैकुठांत वास करून राहिले पुन्हा परत आले नाहींत.

: ४३ :

## बिहो बिहो तेरी सबल माया

हे विठ्ठला ! माया अत्यंत प्रबल असून आतांपर्यंत तिनें अनेकांना भुलविले आहे. मायेच्या मोहांत ब्रह्म दिसूं शकत नाहीं. पण ब्रह्म प्राप्तिनंतर मायेचे अस्तित्वच नष्ट होते. नामदेव म्हणतात, विभिन्न दिसणाऱ्या परमेश्वरा ! दशेंद्रियरूपी घोड्यावर स्वार होणारा तूंच परमात्म स्वरूप श्रीकृष्ण आहेस.

———

# चिरंजीव अश्वत्थामा

पूर्वीच्या काळीं या भारतभूमींत थोर पुण्यात्मे होऊन गेले. त्यापैकीं कांहीं आमचें मार्गदर्शन करण्यासाठी हजारों वर्षे लोटली तरी गुप्त रूपानें आजही आमच्यांत वावरत आहेत. ते चिरंजीव आहेत. आद्य श्रीशंकराचार्यांनी याचा उल्लेख आपल्या एका श्लोकांत केलेला आहे. त्या पुण्यात्म्यांनीं तपस्येच्या बळावर जन्ममरणापासून स्वतःची सुटका करून घेतली परंतु तेवढ्यानें त्यांचे समाधान झालें नाहीं. प्राणिमात्राबद्दल व त्यांच्या भवितव्याबद्दल करुणेनें व्यापलेले त्यांचे अंतःकरण ! त्यांना स्वार्थाबरोबर परार्थही साधण्याचा होता. आपल्यामुळें झाला तर अनेकांचा उद्धार व्हावा ही त्यांची भावना. संसारबंधनांतून व देहबंधनांतून ते मुक्त झालें तरी ती मुक्ति त्यांना पुरेशी वाटली नाहीं. इतरासाठींही मुक्तीचा मार्ग मोकळा व्हावा ही त्यांचीं आकांक्षा. अनन्य साधारण करुणेनें त्यांचें मन व्यापलेलें ! त्यामुळें इतरांच्या शाश्वत सुखासाठीं झटण्यांत त्यांनीं आनंद मानिला.

असे चिरंजीव पुण्यात्मे आजही आपल्यांत वावरत आहेत, परंतु आपणास त्यांची कल्पना नाहीं. असे पुण्यात्मे आपल्या नजरेसमोरून कधीं कधीं जातात. परंतु त्यांना ओळखण्याची आपली ताकद नसते. एखाद्याची योग्यता ओळखायला किंवा त्याच्या मोठेपणाची जाणीव व्हायला आपल्यांतही मोठेपणा असावा लागतो. ज्ञानी माणूस ज्ञान्याला जाणूं शकतो.

हेंच पहा ना. राजा दशरथ हा नामवंत व प्रजाहितदक्ष राजा होता; परंतु आपल्या मुलाच्या म्हणजे श्रीरामचंद्राचा मोठेपणा तो ओळखू शकला नाहीं. श्रीराम म्हणजे प्रत्यक्ष भगवंताचा अवतार हें तो समजूं शकला नाहीं. ऋषी विश्वामित्र रामाची योग्यता समजूं शकला. कारण तेवढ्या योग्यतेला ते ऋषीवर्य पोहोंचले होते.

मानव प्राण्यांची उत्क्रांति होत चालली आहे. तो सतत प्रगतिपथावर आहे. जन्मोजन्मीं हा प्रवास चालू आहे. अपूर्णांतून पूर्णत्वाकडे जावयाचें. तें पूर्णत्व उगाच वाट्याला येत नाहीं. त्यासाठीं कोणी ना कोणी मार्गदर्शन करावें लागतें. आणि ज्या कोणास पूर्णत्वाकडे जाण्याची आस लागलेली असते त्यांना योग्यवेळीं, त्यांना न समजू देतां मार्गदर्शन करणें हेंच त्या चिरंजीवांचें जीवन कार्य.

आमच्या पुराण ग्रंथांतून सप्तचिरंजीवांचा उल्लेख आहे. चिरंजीव कोण ? जो सर्वकाळीं आमच्यांत वावरत असतो तो. हनुमान, बिभीषण, व्यास, महाबली, अश्वत्थामा या थोर पुण्यात्मांचा समावेश सप्तचिरंजीवांत करण्यांत आलेला आहे. ज्या देहांत ते होते त्याच देहांत ते आजही अदृश्य रुपानें वावरत आहेत असा आपला सर्वसाधारण समज आहे.

रामभक्त हनुमानजी आजही आपल्यांत कुठें ना कुठें वावरत आहेत. वीस लक्ष वर्षापूर्वीचा तो त्रेतायुगाचा काळ. त्या काळांतील हनुमान आजही आमच्यांत वावरत

असावे ही आश्चर्याची गोष्ट वाटत असली तरी तसा आपला समज आहे व तो खराही असूं शकेल.

असाही समज आहे कीं या चिरंजीवांना मर्जीनुरूप वेगवेगळीं रूपें धारण करतां येतात.

अश्वत्थामा हा त्या चिरंजीवांपैकीं एक आहे. त्याच्यासंबंधीं येथें थोडें लिहायचें आहे. त्रावणकोरमध्यें व त्या आसमंतांत वावरणाऱ्या लोकांत असा एक विश्वास आहे कीं त्रिवेंद्रमच्या दक्षिणेस सात मैलांवर 'केवलम्' टेकडीवरील गुहेंत त्याचें वास्तव्य आहे. त्या गुहेंत पाणी आहे व त्या पाण्यांतच त्याचें वास्तव्य असतें. त्रिवेंद्रम येथून सुमारें तीन मैलांवर तिरुवल्लम् क्षेत्र आहे तेथें पूजाअर्चा करण्यासाठीं मध्यरात्रीच्या सुमारास त्याचें आगमन होत असतें.

चिरंजीव या नात्यानें सात जणांचीच नावें कां घेण्यांत यावीं हें समजण्यास मार्ग नाहीं. मार्कंडेय, ध्रुव यांच्यासारखे थोर पुण्यात्मे आपल्यांत पूर्वकाळीं होऊन गेलले आहेत. त्यांना चिरंजिवांत कां स्थान मिळूं शकलें नाहीं? तें कसेंही असो.

तिरुवल्लम् येथील लोकांची सर्वसाधारणपणें अशी श्रद्धा आहे कीं अश्वत्थामा रोज अदृश्य रूपानं तथील मंदिरांत येतो आणि पूजाअर्चा करून जातो. जवळपास रहाणारे पुजारी सांगतात कीं पूजेसमयीं होणारा घंटानाद कधीं कधीं मध्यरात्रीच्या सुमारास कानांत पडतो. सकाळीं पूजाअर्चा करण्यासाठीं पुजारी मंदिरांत आले म्हणजे पूजेचें साहित्य, मांडीं इकडे तिकडे पडलली आढळून येतात!

अश्वत्थाम्याच्या या येण्याजाण्यासंबंधीं त्या भागांत कांहीं गोष्टी प्रचलित आहेत. येथें १-२ सांगतों. एकदां काय झालें कीं त्या देवालयांत कांहीं ना कांहीं कामकाज करणाऱ्या एका नोकराच्या पोटांत फार दुखूं लागलें. देवाला दाखवून मागें राहिलेला व कधीं कधीं शिळा झालेला नेवेद्य खाऊन तो रहात असे. उपजीविकेचें तेंच एक साधन होतें.

एकदां पोटदुखीच्या स्थितींत पोट भिंतीला टेकून तो नोकर कण्हत होता. त्या मध्यरात्रीच्या वेळीं देवळांत प्रवेश करणाऱ्या कोणा एकानें त्याची चौकशी केली.

"काय होतय तुला!"

"मी येथें मिळणारें तें शिळेंपाके अन्न खातों. त्यामुळें पोटांतून कळा येतात. अन्न विकत घ्यायला माझ्यापाशीं पैसा नाहीं.!"

हें त्या नोकराचें उत्तर ऐकून तो गृहस्थ पलिकडे असलेल्या एका झाडाकडे बोट दाखवून म्हणाला, रोज पहाटे त्या झाडाच्या बुंध्याजवळ थोडेसें खणल्यास तुला चांगले अन्न विकत घेण्यापुरते पैसे मिळतील. खड्डा खणल्यानंतर तो पूर्ववत् बुजवून टाकावयाचा. पुन्हा दुसऱ्या दिवशीं पहाटे येऊन खणावयाचें, मिळेल तो पैसा घेऊन

खावयाचें. परंतु एक गोष्ट लक्षांत ठेवायची; व ती म्हणजे कोणत्याही परिस्थितींत यासंबंधीं कोणाही जवळ चकार शब्दही बोलायचा नाहीं. हें गौप्य बाहेर फोडायचें नाहीं!

एवढें सांगून तो गृहस्थ तेथून गेला. दुसऱ्या दिवशीं पहांटेच्या प्रहरी काय अनुभव येतो तो पहाण्याची उत्कंठा त्या नोकरास लागून राहिली होती. बिछान्यावरून उठतांच तो नोकर त्या झाडाजवळ गेला व त्याच्या बुंध्याशीं त्यानें खणून पाहिलें तों खरेंच जरुरीपुरते पैसे त्याला मिळाले. त्याची त्या दिवसाची जेवणाखाण्याची गरज उत्तमप्रकारें भागली. किती आनंद झालाय त्याला! तो सुखी झाला. आनंदांत कामकाज करूं लागला. हें स्थित्यंतर कशामुळें घडून आलें याची दाद त्यानें कोणालाही कधीं लागूं दिली नाहीं.

दिवस असेच आनंदांत जात होते. बायकोचें लक्ष नवऱ्याकडे होतें. नवरा रोज पैसे कुठून आणतो पूर्वी त्याच्याजवळ पैसा नव्हता, आणि आतां तर जेवणाखाण्याची चैन चालू आहे! तिनें या स्थित्यंतराचें कारण, नवऱ्याला विचारलें, परंतु त्यानें उत्तर देण्याची टाळाटाळ केली. परंतु बायकोपुढें अशी टाळाटाळ किती दिवस चालू शकणार! तिनें एके दिवशीं हट्टच धरला. "सांगा मला काय तें! नाहीं तर मी जेवणार नाहीं."

अशा सत्याग्रहापुढें गरीब बिचारा नवरा काय करणार? त्याला शरणागति पत्करावी लागली! जी गोष्ट करू नये ती करावी लागली! शेवटी इतके दिवस उराशी जतन करून ठेवलेले गौप्य त्यानें बायकोला सांगून टाकलें व तो एकदाचा मोकळा झाला! मोकळा झाला तो कायमचाच!

कसा तो पहा! नेहमीप्रमाणें त्यानंतर दुसऱ्या दिवशीं पहाटे तो त्या झाडाखालीं गेला आणि खण खण खणूं लागला! खूप खणून पाहिले! काय सांपडलें? दगड आणि माती! नेहमींप्रमाणें पैशांचे नांव नाहीं.

तो गृहस्थ म्हणजे अश्वत्थामा होता असा सर्वांचा समज आहे. त्या भागांत सर्वत्र प्रचलित असलेली आणखी एक गोष्ट ऐकण्यासारखी आहे.

अशीच आणखी एक कथा. अय्या पिल्ले व त्यांचे बंधू हे दोघेही शेतीभाती करीत असत. तिरूवल्लमच्या आसपास त्यांची शेतवाडी होती. तेथेंच आपल्या कुटुंबियांसह ते जवळच्या भागांत रहात असत. एके दिवशीं अय्या पिल्ले खूप उशीरपर्यंत शेतांत काम करीत होता. शेवटीं तो दमला भागला, भुकेलाही. त्याच्यानें चालवत नव्हतें. कसा तरी रस्ता काटीत होता. इतक्यांत त्याला त्रिचेंद्रच्या रस्त्यानें कोणी तरी इसम येत असल्याचें आढळून आलें. त्याला पाहून अय्या म्हणाला, "अरे बाबा! मी अगदीं थकलेला आहे. पाऊल टाकवत नाही. तुझ्या गाठोड्यात काहीं खाण्यासाठीं असल्यास मला कृपा करून दे!"

तो परका गृहस्थ म्हणाला "माझ्याकडे काहीं नाहीं. फक्त एक केळें आहे. हें घे आणि खा. मी जातो."

# शरण

लेखक : प्र. श्री. जठार.

" शरण तुला आला आणि वाया गेला दाखवा दाखवा ॥
ऐसा कोणी " उलट पाप्यावरी तुझी प्रिती अधी असतसे ॥

**मा**गच्या अंकांत संत विनोबांचा " भगवंताचें विराट स्वरूप " लेख वाचला आणि साईबाबांच्या वरील वचनाची आठवण झाली. ईश्वराच्या हुकमाशिवाय जगांतील कोणती बरी किंवा वाईट गोष्ट होत नाहीं. चांगल्यांत देव असतो आणि वाईटांत पण देव असतो. फरक इतकाच कीं देवाला कर्मयोग—सुकर्मयोग म णसानीं सुद्दाम करावा ही इच्छा असते व तो प्रत्येक माणसानें करावा, व वाईटाकडे पूर्ण पाठ फिरवावी. देवानी कधीं कर्म—त्याग केला आहे का ? " प्राप्त—कर्म " हा ईश्वरी संकेत असतो. त्यावरच " श्री गीतेचें प्रवचन आहे. श्री भगवान् श्रीकृष्णांनीं सांगितलें बाबारे अर्जुना तुझें प्राप्तकर्म युद्ध करणें आहे. संन्यास घेणें नव्हे. तूं क्षत्रीय आहेस. आणि जरी तूं युद्ध केलें नाहींस तरी हे सर्व दृश्य लोक माझ्या लिलेनें मेलेलेच आहेत. तूं फक्त कारणीभूत——एक साधन म्हणून आहेस. म्हणूनच मी परत तुझा भ्रम नाहींसा करून, तुझ्याकडून हें कार्य करून घेणार आहे.

वेद सांगतात मी " अहं ब्रह्म " आहें म्हणून. ह्या दृश्य ब्रह्माचें प्रतीक माझ्या हृदयांत प्रतीबिंबीत होतें. " चैतन्य " मला बुद्धी योगानें जाणवतें. कर्म हे अव्यवहीत (सतत) चालूच असतें. फक्त आपल्या मनाला सदसदविवेक बुद्धीला तें पटले पाहिजे. आणि जर तें पटलें नाहीं तर आपणाला पश्चाताप झाला पाहिजे. आपलें मन रहले पाहिजे कारण इंद्रीया नाम मन " माझे वास्तव्य आहे. " तूं मला

---

अश्वत्थाम्यानें तें केळें सोलले व खाल्लें. त्याची भूक शांती पूर्णपणें झाली !

नंतर तो घरीं गेला आणि घरच्या मंडळीला आपणास कडकडून भूक कशी लागली होती व वाटेनें कोणी एक इसम भेटून, त्यानें आपणास एक केळ खावाला कसें दिलें व आपली भूक कशी निवाली ती सारी हकीकत सांगितली. परंतु साध्या भाषेत नाहीं तर काव्याच्या रुपानें. सर्वांना आश्चर्य वाटलें व तोही आश्चर्य-चकित झाला. काव्यगंगा कांहीं केल्या थांबेना. तो प्रवाह सतत चालू होता. तोच अय्या पिळ्ळे पुढें नामवंत कवि झाला. अनेक काव्यग्रंथ त्यानें रचिलें ' रामकथा पट्टु ' हा मोठा काव्यग्रंथ त्याचाच होय. तेव्हां तो रस्त्यांत भेटलेला दुसरा कोणी नसून अश्वत्थामाच होता असा सर्वांचा विश्वास आहे.

( प्रो. आर. श्रीनिवासन यांच्या एका इंग्रजी लेखाच्या आधारें. )

---

ओळख " हेच सर्वांचें तत्त्व आहे. मनाच्या ह्या अश्रुनी मनुष्य शुद्ध होतो. पापमोचन होतो. वाल्याचा वाल्मिकी होतो. असं आहे ह्या शुद्ध–पश्चातापाचें महात्म्य आहे.

## श्री. प्रधान यांचा लेख

दुसरा सुंदर व अधिकारी व्यक्तीनें लिहीलेला लेख म्हणजे " गगन विहार " ले, श्री. के. कृ. प्रधान. अशा तऱ्हेचें लेख क्वचीतच इकडे अगर पाश्चात्य मासिकांत वाचावयास मिळतात.

मानस तपश्चर्येनें साधक सिद्ध होतो. सर्व सिद्धी सहजगत्या वापरतो व त्यांत त्याला पुढील मार्गाचा स्पष्ट मार्ग कळतो आणि ही एक त्या बाबतींत ईश्वरी कृपाच समजावी. ही अवस्था एकस्वरूप चैतन्यरूप होण्याच्या पूर्वीची असते.

बर्फाळ, हिम वर्षाव, हिम वादळें होतांना, अंतराळांत पृथ्वीच्या कक्षेबाहेर जातांना एक विशिष्ट पेहराव शरीरावर वापरावा लागतो. तसेंच, गमन करतांना ( योग गमन ) देहाला एक बरूपांतर भ्रमण करावें लागते. स्वदेहानें स्वर्गांत जाणारे महात्मे विरळा. पुन्हा ह्या भ्रमण करणाऱ्या आत्माला कोणतेही एक विशिष्ट रुप त्यांच्या त्यांच्या लायकीप्रमाणें घेतां येतें. निकृष्ट उदाहरण भूतयोनी समंध, ब्रह्मराक्षस इत्यादी उत्कृष्ट रुप ईश्वर मूर्ती गोंडस अगर विराट रूप संतांच्या रूपांत दर्शन.

मेल्या शिवाय स्वर्ग दिसत नाहीं हे पूर्णपणें सत्याला धरून नाहीं. " इंद्रियानाम् मन " ह्या अवस्थेंत मन ( आत्मा )हवेंत भ्रमण करूं शकतो आणि त्या व्यक्तीची फक्त आकृती—छाया त्याच्या बरोबर भ्रमण करीत असते, पण ह्या अवस्थेंत ( देह मृत झालेला असतांना ) आकृतीछाया आणि मन भिन्न–भिन्न पण थोडें अंतर ठेवून एकत्र भ्रमण करतात. आणि जर हेंच मन मृत शरिरांत परत प्रवेश करील तर मृत माणूस जिवंत होतो आणि हीच ती संजीवनी विद्या, " हें फक्त सिद्धो योगीचं लोकसंग्राहाकरिता करीत असतो पण फार गुप्तपणानें, नाहीतर मोठाच गाजावाजा होऊन लवकरच समाधी घ्यावयाची पाळी यावयाची. कारण मग देहरूपानें स्वतः रहाण्यांत अर्थ नसतो. असल्या परिस्थितीमुळें पुष्कळ संतानी समाधीची घाई केली आहे. त्याची तीच कार्य समाप्ती असते. संताना भक्त अतिप्रीय असतो. म्हणूनच ईश्वर संताच्या आधीन रहातो.

एकदां बाबानी एका हट्टी बाईला सांगितलें " जा तुझा मुलगा तापांतून बरा होईल. ( प्लेगचा ताप ) पण त्या दुर्दैवी बाईचो समजूत पटेना. ती जास्तच ओक्साबोक्सी रडू लागली मग बाबानी आपली कफनी वर केली. सर्व बघतात तर बाबांच्या दोन्हो काखेत अंड्याएवढ्या प्लेगच्या गाठी. तेव्हां ती बाई समजली कीं बाबानी स्वतःवर मुलाचा प्लेग ओढून घेतला आहे.

साई शरणम् गच्छामि.

———

# मरणांत खरोखर जग जगतें !

आपणांस जें वाटलें, जो पवित्र विचार स्फुरला, जें निःशंक असें ज्ञान वाटलें, त्याच्या प्रकाशांत सतत पावलें टाकीत जाणें हा आपला परम धर्म होय. असें करीत असतां हा देह एक दिवस गळून पडेल. ज्या वेळेस मरणाचा क्षण येईल, त्या वेळेस जीवनाचा परम विकास झालेला असूं दे.

एकदां एकनाथांना एक मनुष्य म्हणाला, "नाथ, तुमचें जीवन किती सुंदर व किती प्रकाशांत ! आमच्या जीवनांत सदैव ओढाताण ! सदैव गोंधळ, कामक्रोध, द्वेषमत्सर यांचा सारखा गदारोळ ! आम्ही तुमच्यासारखें जीवन कसें जगूं ! कोणती युक्ति ! कोणता उपाय ?" नाथ म्हणाले, "तें सारें राहूं दे ; परंतु तुला एक गोष्ट सांगतों. तुझें मरण जवळ आलें आहे. आठा दिवशीं तूं मरणार असें वाटतें." तो मनुष्य घाबरला. तसाच घरीं आला. त्याला सारखें मरण दिसूं लागलें. आठा दिवशीं मरणार. अरेरे ! आतां आठच दिवस ! असें तो म्हणूं लागला. तो शेजाऱ्यांकडे गेला व म्हणाला, "मित्रांनो, मी भांडलों, त्याची क्षमा करा. आठ दिवसांनीं मी मरणार !" तो पत्नीला म्हणाला, "मीं तुला उगीच छळलें. नाहीं नाहीं तें बोललों. तुझें हृदय शतदां दुखविलें. मला क्षमा कर. मी आतां मरणार." त्यानें आपल्या मुलांना पोटाशीं धरलें. तो त्यांना म्हणाला, "तुम्हांला प्रेमानें जवळ घेऊं दे." गांवांत ज्यांच्या ज्यांच्याजवळ तो भांडला होता, ज्यांच्या ज्यांच्याजवळ द्वेष मत्सरानें झगडला होता, त्या सर्वांजवळ जाऊन त्यानें क्षमा मागितली "झालें गेलें विसरा. मी मरणार आठा दिवशीं !" असें म्हणून सर्वांना तो हात जोडी.

आठ दिवस झाले. नाथ त्या मनुष्याच्या घरीं आले. तो मनुष्य नाथांच्या पायां पडून म्हणाला, "आली का वेळ ?" नाथ म्हणाले, "तें देवाला माहीत. परंतु तुझे हे आठ दिवस कसे गेले ? किती कोणाशीं भांडलास ? किती जणांचा अपमान केलास ?" तो म्हणाला, "नाथ, कोठलें भांडण नि काय ! सारखें मरण डोळ्यांसमोर दिसत होतें. सर्वांची क्षमा मागत होतों. झालें गेलें विसरून जा असें म्हणत होतों. भांडायला वेळच नाहीं !" नाथ म्हणाले, "गड्या, आठ दिवस जी गोष्ट डोळ्यासमोर ठेवून तूं वागलास, ती गोष्ट सदैव डोळ्यां-समोर ठेवून आम्ही वागत असतों. एक दिवस हा देह जायचा आहे. तेव्हां देहाचे कुसम न होतां देवाचे व्हावें. गोड बोलावें. सर्वांवर प्रेम करावें. जें अन्न आहे तें

सर्वांस यावें. आपल्या या क्षणभंगुर जीवनानें दुसऱ्यांच्या जीवनांत जर मंगल आनंद निर्माण करतां आला, तर केवढी बहारीची ती गोष्ट होईल !"

मरण म्हणजे जीवनाचें उत्तर. जीवन कसें जगलों हें मरणकाळच्या स्थितीवर दिसून येतें. मरणकाळच्या एका क्षणांत सारें जीवन प्रतिबिंबित होत असतें. अत्तराच्या एका थेंबात ज्याप्रमाणें लाखों फुलांचा अर्क असतो, त्याप्रमाणें मरणकालच्या एका क्षणांत जीवनांतील आपल्या अनंत कायिक, वाचिक व मानसिक कृतींचें सार सांठलेले असतें.

आपण या जगांत सारे दुकान घालून बसलों आहोंत. दुकानदार असतो, तो रोज रात्रीं त्या त्या दिवसाची शिल्लक काढीत असतो. दिवसभर त्यानें शेंकडो उलाढाली केल्या; परंतु त्या सर्व उलाढालींचें सार इतका फायदा कीं इतका तोटा अशा सुटसुटीत उत्तरांत निघते. तो रोजचा जमाखर्च पाहतो, महिन्याचा पाहतो. वर्षअखेर इतका तोटा किंवा इतका नफा असें म्हणतो. बारा वर्षें समजा दुकान चाललें. बारा वर्षांत इतकें कमावलें किंवा इतकें गमावलें असें एकाक्षरी उत्तर तो काढतो. बारा वर्षांतील त्याच्या अपरंपार उलाढालींचें एवढें मिळविलें किंवा इतकें घालविलें एवढेंच सार निघतें.

आपलें सर्वांचें जीवन असेंच चाललेलें असतें. रात्रीं आपण अंथरुणावर पडलों म्हणजें दिवसां केलेल्या शेंकडों गोष्टी आठवत नाहींत. त्या दिवसाच्या महत्वाच्या चारदोन गोष्टी डोळ्यासमोर असतात. त्या दिवशीच्या उलाढालींचें तेवढेंच फलित. एक महिना जातो, महिन्यांतील पांचदहा गोष्टी डोळ्यासमोर रहातात. बाकीच्या गेल्या. वर्ष होतें या वर्षांत काय केलें असा प्रश्न डोळ्यासमोर येऊन दोनचार गोष्टी स्पष्टपणें डोळ्यांसमोर येतात. असें वर्षानुवर्षे होत जातें आणि मरतांना सर्व आयुष्याचें सार म्हणून कांहीं तरी फलित डोळ्यांसमोर उभें राहतें. या जीवनांतील ती कमाई. अंकगणितांतील ती व्यवहारी अपूर्णांकांचीं उदाहरणें असतात. केवढाले ते अपूर्णांक वाढतात ! परंतु शून्य किंवा एक असें सुटसुटीत उत्तर येतें. तसें आपल्या जीवनाचें आहे.

जीवनाचें हें शेवटचें उत्तर धन्यतेचें यावें म्हणून आपण धडपडलें पाहिजे. या जगांत आपण जन्माला आलों, तेव्हां आपण रडत आलों; परंतु सभोंवतींचे लोक आनंदले. त्यांनीं पेढे वाटले, परंतु मरतांना आपणांस आनंद होऊं दे व लोकांना रडूं दे. जीवन कृतार्थ झालें असें मनांत येऊन आपल्या तोंडावर मरतांना प्रसन्नता फुलूं दे आणि लोकांना म्हणूं दे, "अरेरे ! किती सुंदर याचें जीवन ! हा सुंदर मंगल दीप कां आतां विझणार !"

तुकारामानीं म्हटलें आहे :

"सोनियाचा कलश । माजीं भरला सुरारस"

सोन्याचा देह मिळाला, त्यांत का वासना–विकारांचीदारू भरून ठेवायची? का मंगल जीवनाचा सुधारस भरावयाचा? भरतांना गत जीवनांतील मंगल कार्याची स्मृति येऊव कृतार्थ वाटणें याहून धन्यतर काय आहे? परंतु आपण प्रत्येक दिवशीं जर जपून न वागूं, तर मरणाचें सोनें होणार नाहीं. रोज वाटेल तसे वागाल तर मरतांना रडाल, सोन्यासारख्या आयुष्याची माती कराल. म्हणून जपून जाऊं या रोज ध्येयाचें स्मरण ठेवून वागूं या. परमेश्वर जीवनांत शिरायला सर्वत्र उभा आहे. ज्याप्रमाणें दार उघडतांच वारा आंत घुसतो, प्रकाश आंत शिरतो त्याप्रमाणें तुम्ही हृदय जरा मोठें करतांच, बुद्धि जरा विशाल करतांच, दृष्टि जरा प्रेमळ व पवित्र करतांच परमात्मा आंत शिरेल. रवीन्द्रनाथ गीतांजलींत एके ठिकाणीं म्हणतात, "देवा, आयुष्यातील कांहीं क्षणांवर दिव्यतेचे शिक्के होते. तुझी मुद्रा होती." प्रभु तुमच्या क्षणावर दिव्यतेचा शिक्का मारावयास उभा आहे. तुम्हीं प्रत्येक क्षण प्रभुसमोर घेऊन जा. प्रत्येक क्षण ध्येयार्थ जावो. म्हणजे मरण मंगल होईल. ध्येयाची संतत धारा सदैव स्रवूं दे. जें आज तेंच उद्यां, जें या महिन्यांत तेंच पुढल्या; जें या वर्षी; जें या जन्मी तेंच पुढल्या; अशा रीतीनें जें थोर ध्येय मिळालें, त्याचा मागोवा घेत सारखें जाऊं या. ग्रह सूर्या भोंवतीं फिरून प्रकाशित होतात, त्याप्रमाणें ध्येयाभोंवतीं सतत कायावाचामनें करून प्रदक्षिणा घालीत राहून आपण आपलें जीवन प्रकाशित करूं या.

आठव्या अध्यायातील मरणाच्या भव्य रूपकाचा हा अर्थ आहे, मरण कसें यावें? त्या वेळी कशी परिस्थीत असावी? कशी नसावी? याचें रूपकात्मक मनोहर वर्णन आठवा अध्याय देत आहे. दक्षिणायन असतांना मरूं नये. रात्र असूं नये धूर असूं नये. कृष्णपक्ष असूं नये. या सर्वांचा अर्थ काय? दक्षिणायनांत दिवस लहान व रात्री मोठ्या म्हणजे कर्म करायला थोडा वेळ. तसेंच दक्षिणायन आलें म्हणजे आकाश मेघाच्छादित असतें. प्रकाश नाहीं. याचा अर्थ हृदयाकाश आसक्तीच्या ढगांनी भरून गेलेलें असतें. रात्र असणे म्हणजे जीवनांत कर्मज्वाला धगधगीत पेटलेली नसणें, कर्तव्याचा प्रकाश नसणें. धूर असणें म्हणजे निःशंक ज्ञान नाहीं. सारेंच संशयी वातावरण. कृष्णपक्ष म्हणजे चंद्राचा क्षय होणें. चंद्र ही मनाची देवता. कृष्णपक्ष म्हणजे मनाचा विकास झालेला नसणें अशा स्थितींत मरण येणें म्हणजे दुर्दैव होय. ज्याच्या मरणप्रसंगीं आसक्ति जवळ उभी असेल, कर्महीनता समीप असेल, अज्ञानांधकार असेल, संशय असेल मन खुरटलेलें असेल त्याचें जीवन व्यर्थ गेलें. याच्या उलट, जो दिवसा मरतो, प्रकाश असतां मरतो, कर्मज्योती झगझगीत पेटत असतां मरतो. उत्तरायणांत म्हणजे हृदयाकाश निर्मळ असतांना, कर्म करायला मोठे दिवस असतांना अनासक्त मनाने जो मरतो, तो धन्य होय! तें मरण म्हणजे जीवनच. परम थोर असें ते मरण असतें.

# बुडतें हें जन न देखवे डोळा

पुष्कळांचें असें मत असतें कीं, आपली उन्नति व्हावयाला आपण नेहमीं आशावादी असलें पाहिजे निराशावादी जे असतात ते आपली व इतरांची उन्नति करण्याला समर्थ असतात. कारण निराशेच्या ओझ्यानें त्यांचें मन दडपून गेलेलें असतें. हें जरी खरें असलें तरी जगाच्या एकंदर स्थितीचें निर्विकार मनानें निरिक्षण केलें व हें जग नानाप्रकारचे रोग, शोक, दुःख व दैन्य ह्यांनीं ओतप्रोत भरलेलें आहे, ह्यामध्यें सर्वत्र असमता दिसून येते, हें पाहिलें म्हणजे आशावादी रहाणें अगदीं अशक्य आहे अशी खात्री झाल्याशिवाय रहात नाहीं. जगभर, 'बळी तो कान पिळी ह्या न्यायाचा जय होत आहे, अन्यायानें व अप्रामाणिकपणें वागणारे यश पावतात, पापाचरणाला सीमा नाहीं, अज्ञान, मत्सर, आपलपोटेपणा व व्यसनाधीनता ह्यांचा सर्वत्र वरपगडा झालेला दिसतो, साधुसंतांच्या ऐवजीं ढोंग्यांचा दिसून येणारा सुळसुळाट ही वस्तुस्थिति असल्यामुळें आशेला जागा कोठें आहे ! अशी स्थिति पाहिली म्हणजे मनुष्यस्वभाव अधम आहे असें वाटूं लागतें व सुधारणेचे सर्व प्रयत्न निष्फल आहेत, अशी खात्री झाल्याशिवाय रहात नाहीं.

आधुनिक जगाकडे पाहिले तर निराशाच होण्याला कारणें आहेत. मागची स्थिति ह्यापेक्षांहि वाईट होती. स्वतःच्या अंतःकरणाची परीक्षा पाहूं लागलें तर तेथेंहि पापाचा संभव दिसतो सत्याचरण करणें फार कठीण जातें. कर्तव्याचा मार्ग खडतर भासतो. जगाच्या हितासाठीं स्वार्थत्याग करून काम करणाऱ्यांना ज्यांच्यासाठीं तें करावयाचें त्यांच्याकडून विरोध होतो व कार्य करीत असतां पाठीचा कणा मोडून जातो. जग आपल्या हितचिंतकांचा द्वेष करतें व अनेक वेळा सुधारकांना

---

असें मरण यावें म्हणून आपण भारखं धडपड केली पाहिजे. आसक्ति, आलस्य, वासना-विकार या सर्वांना जिंकून घेतले पाहिजे. कृष्णाची मुरली शरदृतून वाजली. ज्या वेळेस आकाश निर्मळ आहे, चांदणें पडलें आहे, फुलांचा सुगंध सुटला आहे, अशा वेळेस मुरली वाजते. आपल्या जीवनात ती गोड मुरली जेव्हां वाजेल, तेव्हां सारे मोह आपण जिंकून घेऊ; मारखे अनासक्त वृत्तीनें, निष्काम बुद्धीनें जनता-जनार्दनाची आपल्या स्वधर्मानुसार सेवा करीत राहूं. संत विनोबा

---

आपले प्राण लोकांच्या कळाला बळी द्यावे लागतात. या सर्व गोष्टी मनुष्यप्राण्याच्या अधम स्वभावाच्या द्योतक नाहींत असें कोण म्हणेल !

मनुष्यासंबंधीं निराशा उत्पन्न करणारी ही क्षणभर बाजूला ठेवून आपण जर साधुसंतांच्या म्हणण्याकडे व वचनांकडे लक्ष दिलें तर कसा काय अनुभव येतो बरें ! बायबलामध्यें परमेश्वरानें मनुष्याला आपल्यासारखें निर्माण केलें असें म्हटलें आहे म्हणजे परमेश्वराचे जे गुण त्यांनीं मनुष्य युक्त आहे. रामदासारखे संसार व व्यवहार ह्यांची सांगड घालणारे साधु मनुष्यदेहाची व स्वभावाची महति गातात व कबिराचें म्हणणें असें आहे कीं मनुष्य कृतीने आपल्याला नारायण बनवूं शकेल, इतका त्याचा दर्जा श्रेष्ठ आहे व योग्यता मोठी आहे. इतकी उन्नत स्थिति ज्या मनुष्याला प्राप्त करून घेणें शक्य आहे त्याचा स्वभाव निसर्गतः अधम असेल असें मानणें म्हणजे मानवी स्वभावाची किंमत न ओळखण्याप्रमाणें आहे. मनुष्यस्वभावाचा भागशः विचार केला असतां त्याच्या उच्च श्रेष्ठत्वाची आपल्याला पूर्ण कल्पना होईल.

बुद्धि किंवा ज्ञान हा मनुष्यमात्राचा एक भाग आहे. हें ज्ञान किती अगाध आहे ! आपल्या ज्ञानबलानें मनुष्यानें पंचमहाभूतें आपले दासानुदास करून ठेवले आहेत. पाणी, प्रकाश, वारा इत्यादिकांकडून तो वाटेल तीं कामें करून घेतो. नाना प्रकारचे शास्त्रीय शोध लावून त्यानें मनुष्यजातीच्या सुखामध्यें भर घातलेली आहे. त्यानें आपल्या बुद्धीची इतकी वाढ केली आहे कीं परिश्रमानें तो भूतकालीन गोष्टी बिनचूक सांगू शकतो व भविष्य वर्तवू शकतो. हें विलक्षण बुद्धिबळ त्याच्या अधमतेचेंच द्योतक आहे काय !


मनुष्याच्या स्वभावाचा प्रेम हा एक भाग आहे. शास्त्रीय शोधांपेक्षां त्याचें महत्व अधिक आहे. मनुष्याच्या ठिकाणीं एवढा एक गुण नसता व बाकीचें गुण विपुलत्वें असतें तरी त्यांचे चीज झालें नसतें. ह्या गुणाच्या अभावीं मनुष्यप्राणी म्हणजे एक अत्यंत तुच्छ व तिरस्कारणीय प्राणी बनला असता. आईचें आपल्या बालकाविषयींचें प्रेम, ही दैवी गुणाची खुण आहे. मातापितरांचें प्रेम, बंधुभगिनींचें प्रेम, मित्रामित्रांचें आकृत्रिम प्रेम, पतीपत्नींचे प्रेम, हीं जर जगांत दिसतीं ना, तर हें अखिल जग अरण्यवत् झालें असतें. प्रेमामुळेंच साधुसंत जगासाठीं खपतात व प्राणत्यागहि करतात. 'बुडतें हें जन न देखवे डोळा' असे उद्गार ह्याच प्रेमाची साक्ष होत. देशासाठीं, स्वातंत्र्यासाठीं प्राणत्याग करणें हें प्रेमाचें फळ. हें प्रेम ज्या मानवी स्वभावाचा अंश आहे तो स्वभाव व तो मानव अधम व नीच आहे असें म्हणण्याचें धाडस कोण करील बरें !

जगामध्यें असत्याचें राज्य चालू असलेलें आपण पाहतों. परंतु त्याच्या उलट सत्यासाठीं जीवहि खर्ची घालणारे नरवीर आपल्या पाहण्यांत येत नाहींत काय ?

कर्तव्य करीत असतां प्राणावर बेतलें तरी बेहत्तर, पण कर्तव्यच्युत व्हावयाचें नाहीं ह्या निर्धारानें वर्तणारीं मनुष्यें कांहीं थोडीं नाहींत. हरिश्चंद्रानें सहन केलेला छळ हा पौराणिक नव्हे, कल्पनेचा खेळ नव्हे. असा छळ सहन करणारे आजहि आपणामध्यें आहेत. 'देह सर्व झडो आकाशही पडो अथा' विलक्षण निर्धार करून वर्तन करणारीं नररत्नें जोंपर्यंत मनुष्यजातीमध्यें पैदा होत आहेत, तोंपर्यंत मानवी स्वभावासंबंधानें निराश होण्याचें कारण नाहीं.

हरएक मनुष्याच्या ठिकाणीं असणारी धर्मरतता ही त्याच्या श्रेष्ठ स्वभावाची एक महत्त्वाची साक्ष होय. परमेश्वर गुणसंपन्न आहे असा दृढ विश्वास तो सर्व काळीं व सर्व स्थळीं आहे असा प्रत्यक्ष अनुभव, तो सुखदुःखाच्या प्रसंगी आपल्या संनिध आहे अशी मनाची धारणा करून जो मनुष्य आपला आयुष्यक्रम चालवितो त्याच्या ठिकाणची हीनता नाहशीच झाली असें म्हणणें रास्त होणार नाहीं काय ? " जेथें जातो तेथें तूं माझा सांगाती । चालविसी हातीं धरोनियां ॥ " म्हणजे आपण जें जें करतो तें देवाला साक्षी ठेवून करतों, तो आपला मार्गदर्शक आहे असें जो मनुष्य अनुभवानें बोलूं शकतो त्याचा व त्या विश्वमाउलीचा संबंध अत्यंत निकटचा झाला व अशा मनुष्याच्या स्वभावांतील हीणकस भाग नाहींसा झाला असें प्रतिपादन करणें म्हणजे अतिशयोक्ति नव्हे.

ह्याप्रमाणें साधकबाधक प्रमाणांच्या सहाय्यानें मनुष्यस्वभावाचा विचार केला असतां निराशा नाहींशी होते; व हें जग म्हणजे मायेचा खेळ नसून त्याच्या उन्नतीसाठीं राबणें हें प्रत्येकाचें कर्तव्य होऊन राहतें जगाच्या उन्नतीचें ध्येय प्रत्येक मनुष्याने आपल्यापुढें ठेवणें जरूर आहे. कारण ह्या जगांतील मनुष्यांच्या प्रेमामुळें, सहानुभूतीमुळें व साहाय्यामुळें आपलें एकंदर जीवित सुखमय होतें, त्या जगाचें हित साधण्याला न झटणें म्हणजे कृतघ्नता होय. पण जगाची उन्नति करण्याचा आदर्श आपणापुढें ठेवणाऱ्यांनीं स्वतःची उन्नति प्रथम करून घेतली पाहिजे. आपल्या ठिकाणचे गुण वाढविले पाहिजेत. प्रामाणिकपणें वारंवार आपल्या मनाचें परीक्षण केलें पाहिजे. "आपलें स्वहित साधून परहित साधणें हाच जगाच्या उन्नतीचा खरा मार्ग आहे.



# साईनाथ हॉस्पिटल शिर्डी

( दि. २१-९-६४ ते ३०-११-६४ )

रोख जमा

| | | रु. |
|---|---|---|
| १ श्री एम. जी. भट | मुंबई | १० |
| २ ,, टी. डी. रामनाथ | मद्रास | १० |
| ३ ,, पी. व्ही. जे. नंबीआर | मुंबई | २० |
| ४ ,, पी. एस. लाड | ,, | ३५ |
| ५ साईभक्त | ,, | ५ |
| ६ श्री. व्ही. डी. वैद्य | ,, | ५ |
| ७ श्रीमीत मालतीबाई सलोखे | कोल्हापूर | १० --२ |
| ८ श्री. मयेकर | मुंबई | ११ |
| ९ ,, के. एन. दत्त | दामोह | १०१ |
| १० ,, पी. बी. कुंपर | मुंबई | १० |
| ११ ,, एच. जे. रूशी | ,, | १५ |
| १२ ,, मे. गोल्ड सोप कं. | ,, | २२ |
| १३ ,, व्ही. बी. वैद | ,, | १० |
| १४ ,, एस. एल. पालेकर | ,, | २११ |
| १५ श्रीमती देऊबाई वैती | ,, | १० |
| १६ साईभक्त | ,, | ५ |
| १७ श्री डी. पी. सोलंके | ,, | १०१ |
| १८ श्रीमती विजया क्षिरसागर | ,, | १०१ |
| १९ श्री. एम्. बी. गदी | बेळगांव | १० |
| २० ,, टी. ए. देसाई | मुंबई | ५१ |
| चेकने आलेले जमा | | |
| २१ श्री. रसिक शहा | मुंबई | १०२ |
| २१ ,, आर . एच. टिपणीस | हावरा | ११ |
| २३ ,, एज. जे. महमद | देवळाली | १२५ |
| २४ जस्टीस जे. आर मुंधोळकर | दिल्ली | ५१ |

| | | |
|---|---|---|
| २५ श्री. यु. एस. राव | महाड | १० |
| २६ डॉ होमी जाटलीवाला | मुंबई | ११० |
| २७ श्री. वी. के. पाटिल | डोंबाद | १२५ |
| २८ श्रीमती चंपा आफळे | दिल्ली | २०१ |
| २९ श्री. के. एस. कुंज | अलाहाबाद | १५०० |
| ३० ,, पी. एस. धुले | मुंबई | १०१ |
| ३१ ,, दयाशंकर | दिल्ली | १११ |
| ३२ ,, रत्नाकर राव | मुंबई | १०१ |
| ३३ मेजर पी. ए. नायडू | दिल्ली | ६ |
| ३४ श्री वी. कृष्णन | मद्रास | २०० |
| ३५ श्री. स्टेट बँक-पी. पी. पाटील ट्रस्ट | मुंबई | २१६ |
| ३६ श्री आ. र. बी. नायर | दिल्ली | ५० |
| ३७ मे. पटेल अॅ. कं. | मुंबई | ५१ |
| ३८ श्री. ए. टी. खांडवाला | ,, | १५१ |
| ३९ श्रीमति ताराबेन मास्टर | ,, | १०१ |
| ४० श्री. के. हराहरन | ,, | १०१ |
| ४१ ,, व्ही. सी. देसाई | कंपाला | २६—६६ |
| ४२ ,, एल. वी. प्रभाकर | हैद्राबाद | ११ |
| ४३ ,, के. आनंदराव | बारवाड | ५ |

इंडीयन पो. ऑ. ने

| | | |
|---|---|---|
| ४४ श्री वी. जी. पटेल | नैरोबी-सेक्सकर | २३—१९ |
| ४५ ,, एम्. व्ही. राजा | सैल्सबरी | ६—९२ |
| ४६ सौ. गुलशन हबीब भाई | कम्पाला | २६—५० |
| ४७ श्री आर. कमजेकर | आफ्रिका | २६—५० |
| ४८ ,, व श्रीमति एस बोल्र | मंगलोर | ३९—७५ |
| ४९ ,, पी. कालीदास | जोहान्सबर्ग | २६—५० |
| ५० ,, टी. के. हरी | मुवाफिर्ज | १३—२५ |
| ५१ ,, बी. एस. परमार | प्रेस्टन | २६—५० |
| ५२ ,, एम्. आय. पी. स्वामी | | |
| ५३ ,, एच. शेठ | नैरोबी | १३—२५ |
| ५४ ,, जी. डी. जार्डी | | २६—५० |
| ५५ ,, सी. के. हजारी | कुमासी घाना | १३—२५ |


दिनांक १८-९-६४ पासून ता. २०-११-६४ अखेर रोखीने मासाकडून आलेल्या रकमांची यादी.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री ओ. एस. सक्सेना | मुंबई नं. ७७ | १११ |
| २ | ,, ईश्वरलाल लल्लुभाई पटेल | सुरत | १०१ |
| ३ | ,, रामचंद्र जी प्रभाजी पवले | हिंगोली | २५ |
| ४ | ,, संजय लक्ष्मण कुमार | धुळे | १६ |
| ५ | ,, रमेशकुमार नानालाल दाणी | डहाणू रोड | ५१ |
| ६ | ,, जी. एम. चिंचोलकर | औरंगबाद | २५ |
| ७ | ,, पी. बापय्या | हैद्राबाद | १०१ |
| ८ | ,, तोलाराम पी. उत्तमपदामी | पुना १ | १५ |
| ९ | ,, हेमंत मानेक | धारीया | २०१ |
| १० | ,, आर. जी. भाटीया | मुंबई नं. ७४ | १० |
| ११ | ,, सुषम घाटे | दिल्ली | १०१ |
| १२ | ,, एक भक्त | मुंबई | १०४-१० |
| १३ | ,, पी. ए. पंड्या | अहमदाबाद | ११ |
| १४ | मिसेस रोशन एन् खंबाटा | मुंबई नं. १ | ११ |
| १५ | श्री. डी.जी. ठाकोर | दार एस सलाम | ७ |
| १६ | ,, एम्. जी. शहा | दारेसलाम | १० |
| १७ | ,, आनंदलाल हिरालाल | मुंबई नं. १ | ५१ |
| १८ | ,, चंदुलाल केशवलाल | अहमदाबाद | ११ |
| १९ | ,, विनोद शहा | अहमद नगर | ३ |
| २० | ,, शशीकांत शहा | अहमदाबाद | ३ |
| २१ | ,, डी. जी. पेवा | पुना | २१ |
| २२ | ,, लक्ष्मीकांत दी प्यारेलाल | ताडदेव | १० |
| २३ | ,, मिनू ए. कात्रीक | मुंबई ३४ | १० |
| २४ | श्री. एक साईभक्त | | १ |
| २५ | ,, मथुराबाई गुंडूशास्त्री इनामदार | मुधोळ | ११-२५ |
| २६ | ,, माधव रामकृष्ण दहागावकर | ,, | १० |
| २७ | ,, एस्. कवांजनी | मुंबई | ५ |
| २८ | ,, एस. जी. रणदेवे | मुंबई नं. १ | २५-२५ |
| २९ | ,, शेठ मगनलाल नगीनदास | चोपडे | ५ |
| ३० | ,, मधुकर पांडुरंग शॉफ | मुंबई नं. ७ | १२५ |
| ३१ | ,, वसंत विनेकर | मुंबई नं. १६ | ११ |

| | | |
|---|---|---|
| ३२ ,, कै. सौ. सखमाबाई पांडुरंग श्रॉफ | मुंबई नं. ७ | १०१ |
| ३३ ,, श्री. साईनाथ मेडीकल हॉल | नांदेड | ५ |
| ३४ ,, एच. एस. थापर | देवळाली | ५०१ |
| ३५ ,, संगना भुमाहेड्डी | गदक | १०१ |
| ३६ ,, एम्. डी. माळी पाटील | कौलूर | ३११ |
| ३७ ,, कर्नल सी. के. नायडू | इंदोर | १५ |
| ३८ ,, वाडुभाई मोतीभाई पटेल | शिरपूर | ५१ |
| ३९ ,, ले. कर्नल एस. एस. व्यंकटेश | देवळाली | ५० |
| ४० ,, जयश्री जहांगीर करंजिया | मुंबई नं. ५२ | १०११ |
| ४१ ,, मेसर्स राठी ॲंड सन्स | मूर्तिजापूर | ११ |
| ४२ श्री. पी. व्ही. रावेल एडनवाला | मुंबई | ५१ |


## जनतेचें आरोग्य म्हणजेच राष्ट्राचें सामर्थ्य

राष्ट्र सामर्थ्यवान करण्यासाठीं बलवान व्हा. यासाठीं नियमित व्यायाम आणि खेळ खेळणें जरूर आहे. यासाठीं लागणारी उपकरणें म्हणजे डंबेल्स्, लेझीम...यासारखा सर्वश्रेष्ठ माल आम्ही बनवितों. नगरपालिका, जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती, व्यायाम शाळा, विकास केंद्रें यांना माल पुरवितो.




प्रोप्रायटर—डी. एच्. साबरकर

| | | |
|---|---|---|
| ४३ ,, शेठ मगनलाल नगीनदास | चोपडे | ५ |
| ४४ ,, एस एम आचार्य | नासिक | २१ |
| ४५ ,, किसनलाल मदनलाल | ब्राम्हपुरी | ११ |
| ४६ ,, सी. पी. पटेल | मुंबई न. १४ | १०१ |
| ४७ ,, जी. ए. माटे | मुंबई ५८ | १०६—१३ |
| ४८ ,, वामन नारायण वझकर | मुंबई नं. ४ | १० |
| ४९ कु. शोभा c/o रत्नाकर | मुंबई २८ | २० |
| ५० कला पुजन मायखला | मुंबई ११ | ५०१ |
| ५१ श्री. जनार्दन नाना पाटील | जवला बुद्रुक | २०० |
| ५२ ,, दलाल पी. बाटलीवाला | मुंबई नं. १ | २६ |
| ५३ ,, व्ही. सी. पंडीत | अहमद नगर | ५ |
| ५४ Mis गोपालदास मोहोनदास | मुंबई २२ | ३० |
| ५५ श्री. वाडीलाल जयचंदभाई | अहमदाबाद | ७ |
| ५६ ,, मगेस सुभाष गुजराथी | शिर्डी | २१ |
| ५७ ,, एच. सी. मात्रनानी | मुंबई न. ७४ | १०० |
| ५८ ,, शिवाजी कानजी मेवांवाला | मुंबई | ५—२५ |
| ५९ ,, मुळजी भिमजी आहीया | मुंबई | ५—२५ |
| ६० ,, डॉ. व्ही. के. भाटे | ,, | ५—२५ |
| ६१ ,, बी. एन्. आडाप्पा | मुंबई नं. १२ | २०० |
| ६२ ,, अनुप कुमार पटेल | मुंबई नं. १ | १२५ |
| ६३ ,, अनुपकुमा देसाई | मुंबई नं १ | ४५ |
| ६४ मिसेस सुशीलाबाई अवान | कंपाला | १०१ |
| ६५ श्री. शरद गोबिंद गुदार | बैतल | १०१ |
| ६६ ,, जयाबेन आर. पटेल | मुंबई | १५ |
| ६७ डॉ. डी. आर. पटेल | मुंबई | ११ |
| ६८ श्री. शशीकांत आर. कापडीया | मुंबई नं. १४ | ११ |
| ६९ डॉ. विनोद एन्. भट्ट | मुंबई नं. २६ | ११ |
| ७० डॉ. मिसेस रंजन भट्ट | मुंबई नं. २६ | ११ |
| ७१ श्री. चंदुमती वार्ब रेवो | आबादान | २०१ |
| ७२ ,, संजय लक्ष्मण कुमार | धुळे | २—२५ |
| ७३ Mrs के. एल. कोटगीखार | औरंगाबाद | १०१ |
| ७४ श्री. मोतीराम विठ्ठल गंभीर | जहू | २५१ |
| ७५ मगीलाल वेलजी ठक्कर | मूलूंड | १०१ |

| | | |
|---|---|---|
| ७६ ,, कुप्पेश्वरंमू | मद्रास १७ | ८१ |
| ७७ ,, रणछोडभाई वल्लभभाई पटेल | वराड | ७५ |
| ७८ ,, जी. बी. महाजन | हुबळी | २५ |
| ७९ ,, रूस्तमराव माधवराव जामकर | चितूर | १०० |
| ८० ,, गजानन अप्पाजी | अंधेरी | ५१ |
| ८१ ,, बाबाराव खटारे | मद्रास नं. ३ | ५२-५० |
| ८२ एक साईभक्त | | ११-२५ |
| ८३ श्री. गोविंदभाई पुरुषोत्तम पटेल | सुरत | १०१ |
| ८४ भट फॅमिली | मुंबई नं. ५५ | ७-५० |
| ८५ श्री. एन. डी. अेबरा | मुंबई | ५ |
| ८६ ,, बी. व्ही. ठाकूर | ,, | ११ |
| ८७ ,, हरपाल देवसींग | ,, | २५ |
| ८८ ,, आर. व्ही. पटेल | ,, | ५१ |
| ८९ ,, व्ही. के. शहा वगाळा | ,, | ६५ |
| | | ६२४०-०१ |

दि. १८।९।६४ पासून ११।११।६४ अखेर भक्तांकडून मनिऑर्डरनें आलेल्या रकमांची यादी.

| | | |
|---|---|---|
| १ मेजर व्ही. पी. भातु | अलाहाबाद | १० |
| २ श्री. वासनजी कालजी sons | मुंबई | ११ |
| ३ " बी एम्. भाडे | बलसार | १५ |
| ४ "सोपानदास ठाकूरदास | मुंबई नं २ | १०० |


## लहान मुलांच्या आंकडीवर

### जुनें आणि प्रसिद्ध औषध

**जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी**

घोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

कांचनलाल वाडीलाल कं. — दवाबजार, मुंबई २.

| | | |
|---|---|---|
| ५ कॅ. एम्. व्ही. मेनन | डेहराडून | १—५० |
| ६ श्री. विजयनाथ एम्. काजी. | बिहार | ११ |
| ७ " के. एम्. देसाई माकाम | मुंबई | ५१ |
| ८ " एस. पी दंडवते | पिंपळगांव | १ |
| ९ " शंकर विठोबा गावडे | सुनवडी | २० |
| १० मिस. पी. गौरीकुमार | वेलोर | १३ |
| ११ डॉ. व्ही कृष्णमूर्ती | मद्रास | ६८ |
| १२ श्री. आर. एस. आलेकर | मुंबई | ५१ |
| १३ " एच. जे. शहा | मुंबई | २५ |
| १४ " एम्. व्यंकटेश्वर | मद्रास | २०० |
| १५ " एम्. डी. पारीख | सिकंदराबाद | १०० |
| १६ " रानी | इंदोर | ५ |
| १७ " ए. व्ही. एल. नारायण शास्त्री | वेस्ट गोदावरी | ५० |
| १८ मेसर्स दीपचंद्र बेजीचंद | मुजाफरनगर | १०१ |
| १९ श्री. ए. एम्. मोरारजी | ईस्ट आफ्रिका | १०१ |
| २० मेजर सी. एस. नायडू | कलकत्ता | २५ |
| २१ डॉ. एम्. मिस्तरी | मुंबई | ५१ |
| २२ श्री. ए. के. कलचीअर | मुंबई | ५ |
| २३ " पी. एल. त्रिवेदी | इंदोर | ५० |
| २४ " के. आर. एस. मनी | कोईमतूर | २२५ |
| २५ श्री. डी. ई. सॅमसन | मुंबई नं. ५० | १०० |
| २६ कॅप्टन एम्. व्ही. नायु | डेहराडून | १—५० |
| २७ श्री. एस. डी. ललीत | कलकत्ता | २०० |
| २८ " डी. एम्. अजवानी | भोपाळ | ५० |
| २९ श्री. सुधालक्ष्मी कन्हेरी | मुंबई | ७८ |
| ३० श्री. किशनकुमार | करीमनगर | १२३—५० |
| ३१ " वामन केळकर | रत्नागिरी | ८० |
| ३२ श्री. जयललीथा टी नगर | मद्रास | ११५ |
| ३३ मिस. पी. कल्पना माधवन | मुंबई | २०० |
| ३४ सौ. नर्मदाबाई फुले | मुंबई | ५०० |
| ३५ श्री. आर. के. कालेकर | मुंबई | १० |
| ३६ श्री. आर. के. दवे | मुंबई | ५० |
| ३७ श्री. नानाभाई पटेल | सुरत | ५० |

| | | |
|---|---|---|
| ३८ " जी. के. शर्मा | दिल्ली | ५० |
| ३९ " ओ. एन. कपीला | मुंबई | ४० |
| ४० " आर. कृष्ण मुर्ती | कर्नूल | १०० |
| ४१ " श्रीराम | इन्दोर | १६ |
| ४२ " एम्. के. पटेल | मुंबई | ५१ |
| Mrs. डॉ के. आर. सांडेकर | मुर्तीजापूर | ५ |
| ४४ siM इंडिया मेटल ट्रेडर्स | मुंबई | ५१ |
| ४५ केप्टन एम्. व्ही. राम | डेहराडून | १ |
| ४६ siM रतीलाल ब्रदर्स | बेंगलोर | ४० |
| ४७ श्री. आर. एस. आलेकर | मुंबई | १०१ |
| ४८ " एस व्ही. द्विवेना | मुंबई | ५१ |
| ४९ " कळवंत | नागपुर | १० |
| ५० श्री. अह्नी प्रभा | मुंबई | ५ |
| ५१ श्री. पी. व्ही जी. राजू | दुर्ग | १५६ |
| ५२ श्री. एस्. व्ही. शर्मा | कल्याण | १० |
| ५३ " वियै. बाजी | मूल | २१ |
| ५४ " एस्. आर. एस् मणी | कोईमतूर | ३० |
| ५५ " व्ही. एस्. शेट्टी | मुंबई | ५० |
| ५६ " रावजी भाई पटेल | केरा | १०० |
| ५७ " एम्. के. देसाई | जला पोर | ४० |
| ५८ " एम. एच. कुलकर्णी | बेलगांव | १५ |
| | | ३६१९–४० |



# श्री साईबाबा व चांदोरकरादि भक्त

( ले. द. शं. टिपणीस )

## लेखांक ६

## संसारांतील दृष्टीकोन–मातापित्याची सेवा–पतीपत्नी मातृत्व; स्त्री स्वातंत्र्य–लोकशाहीचा पाळणा

जग ही बंदी शाळा आहे असें कोणास वाटतें, कोणी समजतात कीं जग ही रंगभूमि आहे तर कोणी म्हणतात जग ही धर्म शाळा आहे. आपलें जीवन हें धर्मशाळेंतील जीवनासारखें आहे. बंदीशाळा काय, रंगभूमि काय किंवा धर्म शाळा यां सर्वांमध्यें एकसमान अर्थ आहे. मानवी जीवन व्यतीत करण्याची हीं कायमची ठिकाणें नाहींत. जो बंदीशाळेंत आहे तो केव्हां केव्हां मुक्त होऊन बंदीशाळा सोडून जाणार हें निश्चित. रंगभूमीवरील नट आपलें कार्य संपल्यावर रंगभूमि सोडून आपल्या घरीं जाणार हें खास. धर्मशाळेंतील प्रवाशी जरूर त्या विश्रांतिनंतर पुढील मुक्काम गांठण्यासाठीं धर्म शाळा सोडून चालूं लागेल यांत संशय नाहीं. तिन्ही कल्पनामध्यें तात्पुरतेपणा ध्वनीत असला तरी तिघांचा अर्थ मात्र एकसारखा नाहीं. बंदीशाळेनें परतंत्रता व बद्धता दर्शविली आहे तर रंगभूमीनें आपण आपलें खरें रूप बाजूला ठेवून दुसऱ्याच कोणत्या तरी रूपानें वावरत असतों हें ध्वनीत केलें आहे. धर्म शाळेनें कांहीं कारणास्तव थांबलेले प्रवाशी आहोत असें व्यक्त केलें आहे. या तिन्ही गोष्टी संसारांत येतात. संसार हा तिरंगी आहे. ' प्रपंच ही धर्मशाळा असें बाबा म्हणतात.

**हा प्रवास कशासाठीं ?**

पूर्वी मौंजी बंधनानंतर बटु काशी यात्रेला जात असत. कल्पना ही कीं ते गुरुगृहीं विद्यार्जनासाठीं जात बारा वर्षांच्या तपश्चरणानंतर ते सुशिक्षित, सुसंस्कृत होऊन स्वगृहीं परत येत असत. आपणही सर्व ब्रह्माचे बटु आहोंत. त्यानें आपल्याला काशी यात्रेला धाडलें आहे. यात्रा संपवून पुनः मूळ ठिकाणीं आपणास जावयाचें आहे आपल्याला विश्वेश्वराकडे जावयाचें आहे. कांहीं तरी विसरलों आहोंत. म्हणून मूळ ठिकाणावरून आपण पदभ्रष्ट झालों आहोंत हरवलेलें मिळालें, विसरल्याची स्मृति झाली कीं आपला हा प्रवास संपून आपण स्वगृहीं विश्वेश्वराकडे जाऊं तें मिळविण्यासाठीं त्याची स्मृति होण्यासाठीं आपला हा प्रवास आहे. काखेंत कळसा पण शोधण्या

साठीं गांवाला वळसा असा हा आपला प्रवास आहे पृथ्वीवरून नव्हे. अवकाशांतून नव्हे तर कालप्रवाहांतून आपला प्रवास चालू आहे. प्रवास फार लांबीचा आहे. प्रवासांत आपण दमतों, थकतों आपल्या जवळची साधन सामुग्री संपते. यास्तव विश्रांति घेण्यासाठीं, पुढील प्रवासास लागणारी साधन सामुग्री जमविण्यासाठीं ठिकठिकाणी स्थानके, धर्मशाळा असतात. कालप्रवाहांतील प्रवासास आपण जीवन म्हणतों व स्थानकाक तात्पुरत्या मुक्कामाला धर्म शाळेला आपण संसार म्हणतो. संसार हा आपल्या प्रवासांतील तात्पुरत्या मुक्कामासारखा आहे. म्हणून बाबा प्रपंच ही धर्मशाळा असें म्हणतात. धर्मशाळेकडे आपण ज्या दृष्टीने ज्या भावनेनें जितक्या ममतेनें पहातों त्याच दृष्टीनें, त्याच भावनेनें व तितक्याच ममतेनें आपण संसाराकडेही पहावें असें बाबा सांगतात—

> जैसे आपण धर्मशाळेंत जातों क्षणैक राहाण्या प्रत
> तात्पुरती सोय तेथं ।
> घेतों आपण करूनि ॥
> म्हणून त्या धर्म शाळेचा । मोह ना आपणा उरजे साचा ।
> तोच प्रकार येथीचा । प्रपंच ही धर्म शाळा ॥ संतलीलामृत

**प्रपंच ही धर्मशाळा**

ही धर्मशाळा आपल्या मालकीची नाहीं. विश्वेश्वराच्या मालकीची आहे. कार्यासाठीं ती आपणांस दिली आहे. मुदत संपल्यावर ती आपणांस सोडावी लागेल. शिर्डीला आपण जातों. आपणांस तीन दिवस खोली मिळते. खोली आपणांस कितीही आवडली, तिच्यावर आपण कितीही ममता केली, आपला जीव जरी तिच्यांत अडकला, तरी मुदतीनंतर ती आपणांस सोडावी लागेल. हवा पाणी उत्तम प्रकृतीला चांगली, म्हणून कांहीं आपण कायमचे राहूं शकत नाहीं. आपली ही भावना तीन दिवसांची सोबतीण अशीच असते. असें असलें तरी त्या तीन दिवसांत आपली खोली अशी भावना ठेवून ती नीटनेटकी स्वच्छ ठेवण्याचा, बाबांचा ठेवा हें जें आपलें कार्य तें साधण्याचा, व सुखसमाधानानें राहण्याचा आपण प्रयत्न करतों. तात्पुरती, व्यवहारापुरती त्या खोलीवर आपण आपलेपणाची भावना ठेवतों व तीन दिवसानंतर हें तात्पुरतें ममत्व आपण काढून घेतों. यामुळें खोली सोडतांना आपणांस दुःख होत नाहीं. उलट तेथें मिळविलेल्या बाबांच्या प्रसादामुळें व आशीर्वादामुळें अधिक उत्साहानें व आनंदानें आपण पुढील प्रवास चालू करतों. संसार म्हणजे शिर्डीची सुंदर जीवनावर जितकी व जशी ममता, आसक्ती, आपलेपणा आपण ठेवतों तितकीच व तशीच ममता, आसक्ती व आपलेपणा संसाराबद्दल ठेवावा व मुदत संपल्यावर या सर्वांपासून अलिप्त राहण्याची सवय करावी. हा सर्व दो घटकेचा मुक्काम. कांहीही घडलें तरी त्यांस मनाला लावून तें काय घ्यायचें ? जातां जातां बघेल तेकडे

दुसऱ्याचें भलें करीत मिळेल तेवढा जीवनांतून आनंद मिळवीत पुढें जात असावें या वृत्तीनें सांसारीक कामें करीत राहिल्यानें मनास काढून घेण्याची हळूं हळूं संवय होईल. वास्तुतें संसार दुःखाचा आगार नाहीं. शिर्डीस गेल्यावर आपण आपले उद्देश न विसरतां तें ज्यायोगें साध्य होईल त्या तऱ्हेचे व्यवहार आरंभ करीत असतों. तद्वत संसारांत सुखासाठीं, ऐश्वर्यासाठीं धडपडत असतां आपलें संसारात मूळ उद्दिष्ट जें हरचरणें तें गवसणें हे दृष्टीआड न करतां ते ज्या योगें साध्य होईल अशा साधनांचा कसोशीनें उपयोग करीत राहिलें पाहिजे. असें न केलें तर प्रवास व धर्मशाळा या आपल्या पाठीशी कायम लागून जन्ममृत्युच्या रहाटगाडग्यावर आपण गरा गरा फिरत राहूं. धर्मशाळेंत दाखल होण्याला आपण जन्म म्हणतो व ती सोडून जाण्याला आपण मृत्यु म्हणतो. धर्मशाळा ही कांहीं आपल्याला बहाल केलेली नाहीं. आपल्याप्रमाणें इतरही प्रवाशांची येजा तेथें चालू असते. आपल्या मुक्कामांत येणारे हे जे प्रवासी त्यांना आपण नातेवाईक म्हणतों. मुळांत त्यांचे व आपले नातेंच नसतें. कारण ते व आपण एकच असतो. पण कोणीतरी प्रवासी आपल्या कर्मगतीनें आपल्या धर्मशाळेंत येतो व कर्मभोक्तृत्वाला साजेसे नाते आपल्याशीं जोडून देतो. नाहीतर कोण कधीं कोणाला सांगायला गेलाय की तू माझा मामा हो, नाहीतर काका हो वा मुलगा हो म्हणून कुठून तरी बेटा आपल्या घरांत घुसतो व मग इतर सर्वजण म्हणतात हा तुझा मुलगा व आपण खरंच समजतो हा आपला मुलगा. हा बेटा असा वस्ताद कीं कांहीं काळ धर्मशाळेंत मुक्काम ठोकतो व एक दिवस कोणास न विचारतां सटकतां पुढील प्रवासास निघून जातो व दुसऱ्या कोठल्यातरी धर्मशाळेत जाऊन तेथल्या एकाद्याशीं तसेंच एखादें नातें जोडून ठाण मांडून बसतो.

## सारें कांहीं या जन्मापुरतें

सर्व प्रकारची नातीं ही अशी सदैव फिरतीवर असतात.

या अवघ्यांची महती । आहे याच जन्मापुरती ।
मागल्या जन्मीचें निश्चिती । कोठें आहे गणगोत ॥
तें ज्या या जन्मींच सरून जातें । वासना मात्र बद्ध करते ।
तीच वासना कारण होते । पुढलिया जन्मासी ॥

भगवद्गीतेंत श्रीकृष्णानें सांगितलें आहे कीं समुद्रांत पाण्याच्या लाटेमुळें दोन लाकडी ठोकळे एकमेकांजवळ येतात, कांहीं काळ तेथें राहातात व दुसऱ्या एकाद्या लाटेसरशी एकमेकांपासून अलग होतात. काळ प्रवाहांत असंख्य जीवरूपी ठोकळे वाहत असतात. कर्मगतीमुळें ते एकमेकांजवळ येतात. आपलेच समजून ते एकमेकांवर ममता करतात, आनंदांत असतात. तवढ्यात कर्मगतीची दुसरी लाट येते व दोघांना अलग करून जाते. यांच्या हातीं कांहीं राहत असेल तर तें दुःख, संसार हा कर्मगतीच्या लाटेवर सदैव हेलकावे खात असतो. असे शास्त्र

कर्जयेत हें व्यवहार चातुर्य संसारांतही वापरले तर अमर्याद प्रेम, ममत्व, लोभ, आशा आकांक्षा यांपासून उत्पन्न होणारे दुःख आपणांस स्पर्श करूं शकणार नाहीं. संसार म्हणजे सच्चिदानंदाकडे जाणाऱ्या मार्गावरील तुम्हां आम्हा सारख्या पांथस्थांना तात्पुरता मुक्काम करण्याची जागा आहे, आपल्याच प्रमाणें पतिपत्नी, दीर, भावजय, भाऊ-बहीण, पुत्रकन्या इत्यादी पांथस्थ देह प्रारब्धामुळें त्याच ठिकाणी मुक्कामास आलें आहेत, मानवी स्वभाव धर्माप्रमाणें एकत्रितपणामुळें त्यांच्यात व आपल्यांत आपलेपणा उत्पन्न होऊन आपण सर्व एकत्र राहत आहोंत खरें पण तें कांहीं काल आपले कार्य संपल्यावर जो तो कोणी कोणास न विचारतां न पुसतां त्याला नेमून दिलेल्या पुढील मुक्कामीं कूच करील व पुन्हां त्याची व आपली पुनर्भेट त्याच नावारूपांत होण्याचा सुतरामही संभव नाही, हे सर्व ओळखून संसारावर जरूर तेवढें प्रेम व ममत्व ठेवून आपल्या वाट्यास आलेली कर्तव्यें शक्य तितक्या उत्तम रीतीनें करीत राहणें व संबंधीतांचे होईल तेवढे कल्याण साधीत राहणें हा संसारातील चतुराईचा मार्ग होय.

## ममत्वाचा ओलावा

संसारातील नाना व्यवहाराच्या भाऊगर्दीत आपणही सच्चिदानंद पथावरील प्रवासी आहोंत हें न विसरता आपल्या ध्येयाची कोण कोणत्या रूपांत भक्तीच्या साह्यानें आठवण करीत राहाण्यास विसरूं नये. पोस्टाच्या तिकिटाला ओलावा लागला की तें घट्ट चिकटून बसतें तसें आपण प्रेमाच्या ममत्वाच्या ओलाव्यामुळें संसार पटास चिकटून बसतो. यांतच सर्व अनर्थांची बीजें साठविलेली असतात. संसाराच्या प्रेमाचा ओलावा आपणास लागूं न देण्याची दक्षता बाळगून ईश्वरी भक्तिप्रेमाचा ओलावा आपण मिळवावा. हा ओलावा कधीं न सुकणारा असल्यामुळें तिकिट पक्कें न चिकटतां मृत्यू जेव्हां ते संसार वाटेवरून ओढून घेईल तेव्हां या ईश्वरी ओलाव्या-मुळें तें न फाटतां तुटतां सहज सुटेल. देवावर प्रेम करावे. ममत्व करावे. कर्तृत्वकर-ण्यास मानवी प्रेम व ममत्वाची जरूरी आहे. म्हणून संसार हा देवाचा आहे व नातेवाईक ही त्याचीच प्रतीकें आहेत असें समजून त्यांच्यावर प्रेम व ममत्व करावें म्हणजे आपणांस कशाचीही बाधा होणार नाहीं. कोणाचेही हेवे दावे द्वेष, मत्सर आपणास शिवणार नाहींत आहे तें ईश्वराचें. हे तंव तो ईश्वरच करतोय अशी वृत्ति असावी. संत व आपण एकच आहोंत. फरक आहे तो जगाकडे संसाराकडे पहाण्याच्या दृष्टी कोनांत. हा कोन कसा व किती अंशांचा असावा म्हणजे जनार्दन स्वामी वा एकनाथ महाराज यांच्या व आपल्या संसारांत फारसा फरक राहाणार नाहीं हें चांदो-रकराना समजावें म्हणून बाबा सांगतात—

दारा पुत्र कन्या स्वजन । या माझीं माझींचे म्हणून

मनीं वाहता अभिमान । कारण जन्म मरणासी ॥
कांकीं हे देहप्रारब्ध सकल । येथेंचि अवघे सरेल ।
त्याचा लेशही न उरेल । अंती संगती यावया ॥
म्हणुनि या स्वकीयांचा । खोटा मोहन वाही साचा ।
तरीच अक्षय सुखाचा । लाभ होईल तुजलागी ॥
कर्तव्य आपण करावें । कर्तृत्व ईश्वरा द्यावें ।
फल ही त्यासीच अर्पावें । अलिप्त आपण राहावया ॥
ज्ञानाचा करून उपयोग । बरें वाईट जाणे सांग
जें जें बरें त्यासी अंग । देखून वाईट टाकावें ॥
उत्तम कार्यं हाती घ्यावें । तें तें नाना प्रयत्नें शेवटास न्यावें ॥
कीर्ति रूपे उरावें । मागें मरून गेल्यावर ॥ संत लिलामृत.

**आजचे कूट प्रश्न**

नातेवाईक कमी असणें चांगलें कीं जास्त असणें चांगलें ? आई वडील असणें म्हणजे आपण कमावते झाल्यावर संसार थाटल्यावर ते हयात असणें चांगले कीं वाईट ? हें आजचे कूट प्रश्न आहेत. त्यांची अनेकविध उत्तरे असतील त्यांचा विचार आपणास या ठिकाणीं करावयाचा नसून अध्यात्मिक दृष्टया फायदेशीर काय आहे हें पहावयाचें आहे. लग्न झाल्यावर आइ वडील म्हणजे धोंड वाटते. धोंड्या दगडांनीं बनलेल्या धरणामुळेंच उफाळणाऱ्या पाण्याचा सदुपयोग होतो. तारूण्य हें अवखळ नदीचे खळखळ वाहणारे पाणी जिवन आहे. त्याचा सदुपयोग होण्यासाठीं अधून मधून बांध घातले तर चांगले की वाईट ? आईवडिलांची धोंड असली तर उच्छृंखळ मन मर्यादेत राहील. यामुळें तरुणपणीं विशेषतः लग्न झाल्यावर आईवडील हृदयांत असणें हें तारुण्याच्या योग्य विकासास जरूरच आहे. बालपणांतल्या इतकीच तारुण्यांत भरज्वानींत आईवडीलांची जरूर आहे. गाडीला जसा ब्रेक तसे तारुण्याला आईवडिल होत. आईवडीलच काय पण आजा आजीही असावींत संसारांतील घारी त्या. मुलाबाळांवर नातवंडांवर घारीसारखी नजर त्यांची. अनुभवामुळें संसारांतील दोष उणीवा त्यांना अचुक दिसतात व ते तरुण मनाला मार्गदर्शक होतात. म्हातारपण बालपणासारखेंच, जीवनाची ही दोन टोकें. त्यांत थोडेफार मानसिक साम्य असणें शक्य आहे. लहानमुलांशीं नाहीं का आपण समजुतदारपणें वागत ? मग तसेंच म्हाताऱ्यांशीही कां वागु नये ? म्हातारपणात कांहीं दोष निर्माण होत असतील नाहीं असं नाहीं. पण तेवढ्यामुळें चागल्या मार्गदर्शनास, निःस्वार्थी प्रेमास आपण मुकावे काय ? म्हातारा म्हातारी आपणांस अडगळ वाटतें. वडील पेन्शनींत गेले, कीं ते नकोसे वाटतात. कारण त्यांच्याकडून पैसा मिळत नाहीं. परंतु

बाळपणीं त्यांच्याच पैशावर आपण मजा केली. त्यांच्या पालनपोषणामुळें, त्यांनीं काढलेल्या खस्तांमुळें आपण आज मोठे झालों आहोंत, हे अशा वेळी आपण विसरत असतों. मातृदेव भव, पितृ देवोभव, हे तर दूरच राहो; पण साधा आसरा मातही त्यांना सुखासमाधानानें घालण्यास आम्हीं तयार नसतो. आयुष्याच्या टोकाला आलेल्यांची वृत्ति, भावना व जगाकडे पाहाण्याची दृष्टी आपण लक्षांत घेत नाहीं.

## देवाण घेवाण करण्याची जरूरी

कोवळ्या हिरव्या पानानें पिकलेल्या पानाला नांवे ठेवणें व पिकल्यापानानें उलट तर्हेंच करणें हें कांहीं विचारीपणाचें वा समजूतदारपणाचे लक्षण नव्हे झाडावर पहा. दोन्ही पानें कशी शेजारी शेजारें गुण्यागोविंदानें नांदत असतात. पण आम्हाला मात्र व्यवहारांत हे जमत नाही कारण मुलाप्रमाणें वडिलांची तरुणपणाची आधुनिक दृष्टी असणें शक्य नाहीं हे आपण ध्यानीं घेत नाहीं. जो ज्या जमान्यात जन्मला व वाढला त्या जमान्याची छाप त्याच्यावर राहणें अपरिहार्य आहे, हीच गोष्ट म्हातारा आजा आजीनी व आईवडिलानी नव्हे तर इतरही वडील मंडळीनीं लक्षांत घेऊन त्यानीं मुलाबाळाशीं नातवंडाशी समजूतदारपणें मिळते जुळतें घेण्याचा प्रयत्न करावा. दोघांनीही देवाण घेवाण करून आपापले दृष्टीकोन मिळते जुळतें करण्याचा प्रयत्न केला तर संसारांतील भाडण तंटे मिटतील. आई वडीलांचें आपल्यावर ऋण आहे. हें ऋण आपण फेडलें पाहिजे. हें ऋण अंशतःफेडण्याचा मार्ग म्हणजे आई वडिलांची सेवा करणें हा होय. एवढ्यानें आपले कर्तव्य पूर्ण झालें असें मात्र नव्हे. तें कसें पूर्ण होईल याचा विचार पुढे आलेला आहे. बालकाला आईच्या ममतेची जितकी व जशी जरूरी आहे तितकीच व तशीच म्हातान्या आई वडिलांना आपल्या पुत्र सुनेच्या ममतेची जरूरी आहे. यास्तव आई वडिलांस त्यांच्या म्हातारपणीं जीवनाला जरूर असणाऱ्या गोष्टी देणें व त्यांची निगा राखणें हे पुत्राचें व असल्यास सुनेचेंही कर्तव्य आहे. मातापित्याबद्दल आदर आपण ठेवला पाहिजे याचोगे सेवा भाव व त्यात भाव आपल्या अंगवळणीं पडतील. हे भाव संसारांत अत्यंत फलदायी होणारे आहेत.

सत्पुरुषांच्या ऐकणें कथा । चित्ताची टेवी शुद्धता ।
मान राखणें ज्ञानवंता । आपुल्या जनकजननीचा ॥
सहस्त्र तीर्थांचे ठिकाणीं । एक मानावी निजजननी ।
पिता आराध्य दैवत म्हणूनी । वंदन त्यातें करावें ॥

— श्री साईबाबा सांगता

### पतिपत्नीचें पवित्र नातें

संसारांतील सर्व नात्यांत पतिपत्नीचें नाते हें विशेष वैशिष्ट्य असलेले व अर्थपूर्ण आहे. जगाची उत्पत्ती ज्या द्वैतामुळें झाली ते द्वैत म्हणजे पतिपत्नी. ब्रह्म व माया किंवा पुरुष व प्रकृति याच द्विशक्ती पत्ति व पत्नी रूपानें संसारांत वावरत असातात. माया ही कार्य करणारी शक्ति आहे तशी पत्नी ही कार्यकर्ती आहे. मायेला ब्रह्मा पासून शक्ति व चालना मिळते त्या प्रमाणें पत्नीला पतिपासून शक्ति व चालना संसाराचा रणगाडा चालविण्याचे हें कार्य पत्नीला करावे लागतेच या कार्यासाठीं तिला लागणाऱ्या मानासिक व शारिरिक सामर्थ्यांचा व कार्यप्रवीण करणाऱ्या, तिच्यांत उत्साह निर्माण करणाऱ्या नानाविध गोष्टींचा तिला सहज पुरवठा करीत राहणें हें पतिचें कर्तव्य आहे. पतिपत्नी म्हणजे एकाच वर्तुळाची दोन अर्ध वर्तुळें. ती एक झाली, एकजीव झाली कीं पूर्ण वर्तुळ म्हणजे कार्याची पूर्ती होऊं शकते. वर्तुळ हें एक अध्यात्मांतील महत्वाचें चिन्ह आहे. वर्तुळ म्हणजे शून्य. त्याला आदी अंत नाहीं. शोधला तरी मिळणार नाहीं. ते अनंत आहे. पतिपत्निचें कार्य हें अनंताचे कार्य आहे. वर्तुळाचे आदि अंत इतके एकजीव झालेले असतात कीं हा आदी व हा अंत असें दाखविता येणार नाहीं. वर्तुळाला मध्य असतो तसा पतिपत्नीच्या कार्याला शुद्ध प्रेमाच्या मध्य असतो व त्याच्या भोंवती व त्यामुळें सर्व कार्यांचा व्याप वाढत असतो. पतिपत्नी ही एकमेकांचें परिपूरक कोन आहेत. एकाचा उणे पणा दुसरा भरून काढतो. व वर्तुळ म्हणजे कार्य पूर्ण करतो हेंच सांसारीक पतिपत्नीचें कार्य आहे पतीला करतां येते नाहीं तें पत्नी करू शकते व पति करूं शकत नाहीं तें पत्नि करूं शकतो. पतीचा उणेपणा पत्नी भरून काढूं शकते व पत्नीच्या उणेपणाची भरपाई पति करूं शकतो. तसा तो भरून काढणें म्हणजेच संसार करणें होय. पत्नीनें हें लक्षात ठेवावें कीं आपण जो पति केला आहे तो केवळ आपल्या सुखासाठी नसून संसारांतील नानाविध कार्य करण्यास आपणाठायीं जो तोकडे पणा आहे तो भरून काढणारा मदतनीस सहचर म्हणून केला आहे. उलट, पतीने ही याच दृष्टीनें पत्नीकडे पाहिले पाहिजे. एकाच वर्तुळाची अनंताची आपण दोन टोके आहोंत व ती जशीं एकांत एक मिसळून जातात तसें आपण आचार विचार विकार भावनादी रूपानी एकमेकांत मिसळून गेलें पाहिजे, आपणांत एकात्मता पाहिजे, एकार्जनसीपणा पाहिजे हे पतिपत्निनी ध्यानी घ्यावें. खवा व साखर एकमेकांत मिसळली, त्यांच्यांत एकात्मता साधली कीं जसा सुंदर स्वादिष्ट पेढा तयार होतो, तद्वत संसारांत पतिपत्नीची एकात्मता असली तर संसार म्हणजे एक सुंदर स्वादिष्ट पेढा आहे असें वाटेल. मन, चित्त व अंतःकरण यांची इतकी एकात्मता झाली पाहिजे कीं, एकाच्या पायाला कांटा रुतला तर दुसऱ्याला वेदना झाल्या पाहिजेत. पतिपत्नी म्हणजे एकाच प्लगवर चालणारे दोन दिवे होत. एकांत चमक

असाठी की दुसऱ्यांत ती दिसलीच पाहिजे. एक मंद (dim) झाला की दुसरा मंद झालाच पाहिजे. असें होण्यास 'मी' ऐवजी 'तू' ही वृत्ति पाहिजे. त्यानें म्हणावें, 'मला नको तुला. तूं सुखी हो.' तिनें म्हणावें, 'मला नको. तुम्हाला. तुम्ही सुखी व्हा. दोघां-नीही म्हणावे, 'आपणांस नको. मुलांबाळांस असूं द्या. ते सुखी होऊं द्या.' व मुलां-बाळांनीं म्हणावे, 'आम्हांस नको. तुम्हांस घ्या. आम्हास सुख मिळविण्यास भरपूर वाव आहे तुमच्या वाट्यास मात्र आमच्यापेक्षां थोडा कालावधि आहे.' अशा प्रकारची वृत्ति पतिपत्नी व मुलेंबाळें यांच्यात असली तर तो संसार लक्षावधि अडचणी असल्या तरी सुखाचा झाल्या खेरीज राहाणार नाहीं. अशी वृत्ति होण्यास त्यागाची जरूरी आहे. स्वपेक्षां परहिताचाच विचार अधिक पाहिजे. पतिपत्नींनीं एकमेकांसाठीं, मुलाबाळांच्या सुखासाठीं व कल्याणासाठीं त्यागी वृत्ती ठेवली तर तिचा प्रभाव मुलांबाळांवर पडून ते हळूं हळूं त्यागी वृत्तीचे होतील. ते त्यागी झालें की त्याची मुलेंबाळेंही त्यागी होतील. अशा प्रकारे हें लोण चालत राहीलें तर केवढें तरी मोठे राष्ट्रीय तसेंच अध्यात्मिक कार्य केल्याचें श्रेय या पतिपत्नींना मिळेल. अशा प्रकारच्या संसारांत पतिपत्नी मुलेबाळे संयम त्याग, सेवा, शुद्धप्रेम वगैरे गोष्टीं कळत वा न कळत शिकत असल्यामुळें सबंध संसार म्हणजे अध्यात्मांतील उच्च तत्वें शिकविणारें विद्यापिठ होऊन बसते. एवढ्या उच्च पातळीवर पतिपत्नींनीं आपला संसार नेला तर मग बाबा आयुष्यभर जो उपदेश करीत आले त्याचे चीज झालें असें म्हणतां येईल.

## कोणी कोणाचा गुलाम होऊं नये

पतिपत्नींनी एकमेकांशीं सहकार्य करावें हें खरें परंतु हें सहकार्य बुद्धिपुरस्सर एकमेकांच्या सोयीसाठी व त्यागाच्या भूमिकेरून केलेलें असलें पाहिजे. कोणी कोणा-चें गुलाम होऊन राहूं नये व कोणी कोणास गुलाम करण्याचा प्रयत्न करूं नये कोणाचा कोणावर वरचष्मा असूं नये. ताटाखालची मांजरें अशा प्रकार नसावा. भीतिनें दिलेलें सहकार्य उपयोगी येत नाहीं. 'काय करायचं. जन्मकाढायचा ना.' अशा निराशेनें दिलेल्या सहकार्यानें खरा सुखी संसार होणार नाहीं. एक सुखी झाल्यासारखा दिसला तर दुसरा मानसिक मरण भोगीत राहील. एकात्मता असली तरी पतीला काय किंवा पत्नीला काय नितिधर्मास धरून व एका हातेला बाध न येईल अशा प्रकारचें बोलण्या चालण्याचें करण्या सवरण्याचें स्वातंत्र असलें पाहिजे. पुरुषाच्या स्वातंत्र्यावर स्त्रीनें गदा आणूं नये व स्त्रीच्या स्वातंत्र्यावर पुरुषानें घाला घालूं नये. कोणी कोणाच्या बाबतीत अतिक्रमण करणें एकात्मतेला विघातक आहे. संसारांत संशयाची विशाच्चें व गैरसमजाची भूतें नाचत असतात. तुमचा सोन्यासारखा संसार उधळणें एवढेंच कार्य तीं करूं शकतात. पतिपत्नींनीं तीं अंगांत येऊं देऊं नयेत. दिल-खुला पाहिजे. पुष्कळशीं कुटुंबे या पिशाच्चामुळें दुर्दैवी ठरली आहेत. या पिशाच्यानें

एका सुशिक्षित व प्रेमळ पत्नीकडून आपली पत्नी व दोनें लहान कोवळी मुलें यांचा खून करवून घेतला व त्याला आत्महत्या करायला लावून संबंध कुटुंब धुळीला मिळविलें. अशी घटना कांहीं वर्षांपूर्वी घडलेली पुष्कळांस स्मरत असेल. यास्तव संसारांतील नाजूक गोष्टींत दोघांचीहि वागणूक खुली, समजुतदारपणाची, एकमेकांच्या भावना व स्वभावधर्म जमवून घेणारी असावी. संसारात संशयाला थारा मिळेल अशी जागा ठेवूं नये.

## मातृत्वानें पूर्णता

स्त्रीची पूर्णता मातृत्वानें होते व पुरुषाची पितृत्वानें होते. आपलें घराणें व संस्कृती अमर ठेवण्याचा, मातापित्यांचे सिंहासन अबाधित राखण्याचा व राष्ट्राला समाजालाला आणि अखिल मानव जातीला ललामभूत होणारी नररत्नें देण्याचा तो एकमेव मार्ग आहे. कलाकार आपल्या कलेंत, मुर्तिकार आपल्या मुर्तीत, लेखक आपल्या साहित्यांत अमर होतो. तद्वत माता पिता आपल्या मुलांबाळांत अमर होतात. कोठल्या ना कोठल्या तरी रूपानें आपल्या मागें आपलें नांव कायम ठेवण्याची प्रवृत्ति मानवांत असते. यास्तव केवळ स्वसुखासाठीं मातृत्वाला वा पितृत्वाला पूर्ण अटकाव करण्याची येऊं पहात असलेली वृत्ति राष्ट्र व अध्यात्म दोघांनाही घातक आर्थिक परिस्थितीमुळे वा प्रकृतीच्या कारणास्तव मर्यादीत मातृत्व असावें हें योग्य असलें तरी मातृत्व विरहीत पत्नी पितृत्व विरहीत असणें हें स्त्रीत्वाला व पुरुषत्वाला लाजिरवाणें आहे. शिवाय पतिपत्नीकडून मातृपितृ-ऋण॥ फेडले न गेल्यामुळे कर्मगतीच्या नियमाप्रमाणें जो भोग भोगावयाचा असेल तो भोगावा लागेल हें निराळे. हें ऋण फेडण्याचा मार्ग म्हणजे प्रथम मातृपितृपद प्राप्त करून घेतले पाहिजे. नंतर आपल्या मुलांबाळास योग्य शिक्षण देऊन, योग्य मार्गदर्शन करून उत्तम नागरिक बनविले पाहिजे. मुलें आपलीं सन्मार्गरत । होतील ऐसे शिक्षण सतत । देणें आपुल्या मुलांप्रत । नाना गोष्टी सांगोनी ॥ —संत लीलामृत

असा बाबाचा उपदेश आहे. आपल्या मुलांच्या कल्याणासाठीं स्वार्थ बाजूला सारून जरूर ते कष्ट व हाल सोसून राष्ट्रला व समाजाला एक उपयुक्त मानव दिला पाहिजे. असें हातून घडलें तर पतिपत्नीचें मातृ-ऋण व पितृऋण फिटलें असें होईल व ते मुलांबाळांच्या रुपानें अमर होतील. पुत्र वा कन्या यांना शक्य असेल तेवढे योग्य शिक्षण द्यावें. शिक्षण म्हणजे फुरसतींच्या वेळांत लक्ष घालण्याची बाब असें मातापित्यानें समजणें हानिकारक आहे. म्हणून बाबा इशारा देतात की स्त्रियांनीं लहान मुलांच्या संगोपनीं । दक्ष फार असावे ॥ संत लीलामृत

त्यांच्या शिक्षणांत कोणत्याही सबबीवर कसूर करणे, हयगय करणे, स्वतःच्या सुखासाठी त्याला फाटा देणे म्हणजे ऋण फेडण्याला अडथळा करणे होय.

## आईवाडिलांचे कर्तव्य

पुरुषार्थाचें सार्थक करण्याचें व स्त्रीत्वाचा उच्चांक गाठण्याचें सामर्थ्य पुत्र

व कन्येच्या ठायी निर्माण करणें हें आईवडिलांचें पवित्र कर्तव्य आहे. कन्येच्या बाबतींत केवळ शिक्षण दिल्यानें सर्व संपलें असें समजूं नये. भावि कालांत तिलाही मातृपद व पत्नीपद सांभाळायाचें आहे, स्वतंत्र संसार करावयाचा आहे हें लक्षांत ठेवुन त्यासाठीं जरूर ती तिची तयारी करून देणें व योग्य वराच्या स्वाधीन तिला करून नवीन संसारांत तिचें पदार्पण करून देणें हे विशेष कर्तव्य कन्येच्या बाबींत आईवडिलांचें आहे. द्रव्य अथवा राहून वतन । जरटास न करी कन्यादान । असावा जामात सुलक्षण । कन्येस आयुष्य शोभेलसा ।। संत लीलामृत या सर्व गोष्टी पूर्ण झाल्या कीं मग माता पिता त्यांच्या मातृपितृ ऋणांतून मुक्त झालें असें म्हणतां येईल, निसर्गानें स्त्री व पुरुष यांच्यांत मानसिक व शारिरीक तफावत बरीच ठेवलेली आहे. त्यामुळें दोघांची मुख्य कार्यक्षेत्रें निरनिराळी होतात. गृहखातें स्त्रीकडे व परराष्ट्रखातें पुरुषाकडे निसर्गानें दिलें आहे. स्त्रीचे प्रथम कार्य गृहव्यवस्था हें आहे. स्त्री ही गृहलक्ष्मी आहे. त्याचें सर्वांत मोठें वैभव धन म्हणजे मुलें होत. हें वैभव हें धन वाढविणें हें तिचें काम आहे. हे मुख्य कर्तव्य सांभाळून त्याला बाध न येईल अशा प्रकारें एखादें क्षमाशील राष्ट्रीय व दुसरें एखादें उपयुक्त कार्य स्त्रीनें खुशाल करावें. आपली दोन चार मुलें कोणाच्या तरी हातीं सोंपवून कार्य करीत राहणें हें सकृतदर्शनी मोठें कार्य वाटलें तरी भावी काळाच्या दृष्टीनें तें राष्ट्रघातकीच ठरेल. कारण एकीकडे राष्ट्रकार्य करीत असतां दुसरीकडे राष्ट्रासाठीं दोन चार उनाडटप्पू, असंस्कृत स्वार्थी वृत्तीचे नागरिक त्या तयार करीत असतात. बालकांच्या वाढीला मातृ हृदय व मातृ प्रेम यांची जरूरी आहे. पावसा विना पिकें करपतात तशीं मातृप्रेमाविणें बालकांचीं मनें करपतात

**मातेचें आद्य कर्तव्य**

यामुळें योग्य बाल संगोपन हें प्रत्येक मातेचें आद्य कर्तव्य आहे. प्रत्येक मातेनें हें लक्षांत घ्यावें कीं राष्ट्राला उत्तम नागरिकांचा पुरवठा करणें हें अत्यंत पवित्र व मोठें राष्ट्रकार्य आहे. पुरुषाचे मुख्य कार्यक्षेत्र घराबाहेर आहे. आपल्या स्त्रीला उत्तम संसार करतां यावा म्हणुन ज्या ज्या गोष्टींची जरूरी असेल त्या बाहेरील दुनिया जगांत स्वपराक्रमाने कमावून स्वस्त्रीला मदत करणें हें पुरुषाचें आद्यकर्तव्य आहे. कर्णाच्या अंगावर जसें कवच तसें संसारावर पुरुषाचें कवच होय. तें आहे तोंपर्यंत बाहेरून मारा होण्याची भीति नाहीं. या गोष्टी पुरुषवर्गानें ओळखुन आपली सांसारीक कर्तव्यें कसोशीनें केली पाहिजेत. दोघांची मुळ कार्य क्षेत्रें निराळीं असलीं तरी एक उणे व दुसरे दुणें असा भेद पतिपत्नींनीं न मानतां एकमेकांशी नेहमीच सहकार्यानें वागावें व एकमेकांच्या सल्ल्यानें आपली कार्यें करीत राहावें. बाबा म्हणतात पत्नीस प्रेमें वागवावें । परी स्त्रैण कदान व्हावे । तिचें अनुमोदन घ्यावें । फक्त गृहकार्यांत ।। संतलिलामृत.

पतिपत्नी हीं जशी मातापिता असतात तशीच तीं कोणाची तरी भाऊ बहिण असूं शकतील किंवा त्यांना बहीन भाऊ असूं शकतील. आपल्या आई वडीलांची त्यांच्या भाऊबहिणीशीं असलेली वागणूक मुलें लहान असली तरी त्यांच्या लक्षांत आल्या शिवाय राहत नाहीं. मुलांचे काका व वडील यांच्यातच जर बंधुभावाचा अभाव असेल, ते द्वेषानें, मत्सरानें वागत असतील तर मुलांमध्य बंधुभाव कसा उतरणार व बहिणभावांत आपलेपणा कसा निर्माण होणार ? आई व मावशी वा मामा यांच्यामधील वागणुकीच्या पडछाया मुलींच्यावर पडणारच व मुली त्याचे कडूपणाच्या निवणार. यास्तव मातापित्यानीच केवळ नव्हे तर नात्यानें वडील असणाऱ्या इतर मंडळीनीही आपली वागणूक मुलांना आदर्श होईल अशी ठेवली पाहिजे. शेरभर उपदेशापेक्षां गुंजभर उदाहरण अधिक मोलाचें आहे. आडांत नसेल तर पोहऱ्यांत कोठून येणार ? ज्या घराण्यांत मुळातच सुसंस्कृतीचा, माणुसकीचा खळखळदार झराच नाही त्या घराण्यांतील पोहऱ्यांतून त्या झऱ्याचे पाणी येणार तरी कसे ? व मुले पाणीदार होणार तरी कशी ? यास्तव संसारांतील पतिपत्नींचें स्थान जितके महत्वाचें आहे तितकेच ते जबाबदारीचें आहे. घरांतील वडील मंडळींप्रमाणें मुलांच्यावरही कांहीं जबाबदाऱ्या असतात. आई वडिलांचे ऋण फेडणें हें त्यांचेही कर्तव्य आहे. मातृ देवो भव पितृ देवो भव, आचार्य देवो भव जीवनासाठीं जरूर ती तयारी करणें हें त्यांचें मुख्य ध्येय आहे. सुसंस्कृतपणा, उत्तम नागरिकत्व व संसार स्वतां पेलण्याची ताकद प्राप्त करून घेतल्यावर मुलांनी लग्न करून आपला संसार थाटावा व तो करीत असतां सामाजिक, राष्ट्रीय व इतर ऋणें फेडावीत. अशा प्रकारे संसाराचा रथ चालत राहीला तर ऐहिक व पारमार्थिक सुख पदरांत पडेल.

## बाबांचे स्त्री स्वातंत्र्यासंबंधी विचार

स्त्री स्वातंत्र्यासंबंधी बाबांचे विचार काय आहेत तें आपण पाहूं. स्वातंत्र्य सर्वांनाच असले पाहिजे. तो प्रत्येकाचा जन्मसिद्ध हक्क आहे एवढेंच नव्हे तर त्यामुळें व्यक्तीगत वाढ होऊन स्वपराक्रम दाखवेण्यास व्यक्तीला वाव मिळतो वाद उपन्न होतो तो स्वातंत्र्याला मर्यादा घालावी कीं नाहीं, कोठपर्यंत मर्यादा घालावी व ती सर्वांना सारखी असावी कीं नाहीं याबद्दल समाज राष्ट्र व धर्म धारणेसाठी व्यक्तीच्या स्वातंत्र्याला मर्यादा घालणें जरूर आहे हें सर्वांनाच मान्य आहे हें निश्चित कारण तशा तऱ्हेचें कायदे, रुढी, रीतिरिवाज आपण व्यवहारांत पाळीत असतो. हे खरें असेल तर व्यक्तिचा धारणेसाठी त्याच्या शारिरीक व मानसिक पोषणासाठीं व्यक्तीला कांहीं निर्बंध कांहीं मर्यादा असणे जरूर आहे हें स्वयंसिद्ध आहे. यामुळे वादाचा मुद्दा सर्वांना सारख्या मर्यादा असाव्यात कीं नसाव्यात हा आहे. पुरुषाला जें स्वातंत्र्य तेच स्त्रीलाही असलें पाहिजे काय ? नसले तर

अन्याय होईल काय ? संसारांत या समस्या येत असतात व संसार सुरळीत चालण्यासाठीं त्या सोडविणें जरूर असतें. असें न केलें तर स्त्री स्वातंत्र्याच्या वादळांत संसार नौका बुडण्याचा संभव आहे. वास्तविक स्त्री-पुरुष अगर पतिपत्नी यांनीं समजुतीनें सर्व गोष्टी घेतल्या तर असल्या समस्या सहसा उद्‌भवणार नाहींत व यदाकदाचित उद्‌भवल्याच तर त्या सोडविणें फारसे कठीण जाणार नाहीं. हिरा व गारगोटी दोन्ही आपण एकाच तागडयांत जोखतो कां ? गारगोटी कोठेही पडली तरी आपण बेफिकिर असतो. पण हिरा ? त्याच्या बाबतींतहि आपण बेफिकीर राहूं काय ? त्याला जपूं, गोदरेजच्या तिजोरीत त्याला स्थान देऊं. कां ? तो मौल्यवान आहे म्हणून. चोरांची त्याच्यावर नजर असते. यास्तव त्याच्या रक्षणार्थ त्याला स्थानबद्धताच योग्य. स्त्री ही हिरा आहे. हिऱ्याची चमक सुंदरपणा पाहून जाणाऱ्या येणाऱ्यांच्या नजरा फिरल्या नाहींत तर नवल. बुद्धी चळली नाहीं तर आश्चर्य. या हिरकण्यांवर समाज कंटकांचें लक्ष असतें. लांडग्याची नजर शेळीवर असायची. म्हणून मेंढपाळ आपल्या मेंढ्यांना ठराविक मर्यादेबाहेर जाऊं देत नाहीं. असें करणें म्हणजे मेंढपाळानें मेंढ्यांच्यावर अन्याय करणें, त्यांच्या स्वातंत्र्यांवर गदा आणणें आहे असें आपण म्हणूं काय ? असाच प्रकार स्त्रीच्या बाबींत असल्यामुळें तिच्यावर दोन चार नैतिक बंधनें अधिक आली तर तो खरोखरच अन्याय होईल कीं तिच्या हिताचे होईल ? कमरेला दहा हजार रुपये असणाऱ्या माणसानें गर्दीतून बेछूटपणें न जातां सावधगिरीनें गेलें पाहिजे तद्वत स्त्रीनें समाजांत बेछूटपणें न वागतां सावधगिरीनें वागावें. स्त्रीत्वाच्या दृष्टीनें सावधगिरी जरूर त्या मर्यादा स्त्रीला असाव्यांत. या व्यतिरिक्त स्त्रीला आपली सांसारीक कर्तव्यें करून उरलेल्या वेळांत आपल्या आवडी प्रमाणें एकादें उपयुक्त कार्य करण्याची वा शिक्षण घेण्याची मुभा असावी. या संबंधी बाबाचे सांगणे असे आहे.

या स्त्रीदेहांची विचित्र स्थिती । तो अनीतीचा भक्ष्य निश्चितीं ।
म्हणून सावधगिरी अति । ठेविली पाहिजे शिष्योत्तमा ॥
शेळी भक्ष्य लांडग्याचें । म्हणून तिला कुंपण साचें ।
करूनि ठेविती काट्यांचे । रक्षण तिचें करावया ॥
तोच आहे न्याय येथें । स्त्रीदेहरूप शेळीतें ।
तीव्र व्रत कुंपणातें । बांधून रक्षण करावें ॥

संत लीलामृत

## लोकशाहीचा बोलबाला

आता एका गोष्टीचा विचार करून ही लेखमाला संपवूं. आपल्या उपदेशांत बाबानीं त्या गोष्टीचा कधीही उल्लेख केलेला नाहीं यामुळें तिचा तिथें विचार करणें अप्रस्तुत होईल हें खरें. तरी तिचें महत्व व संसाराशी तिचा असलेला संबंध हें लक्षांत

घेतां पदरी दोष पत्करूनही थोडे फार विवेचन करावें असें वाटतें. जिकडे तिकडे आज आपण लोकशाहीचा बोलबाला ऐकतों. हुकूमशाही ऐवजी लोकशाही प्रस्थापित करण्यात अनेक राष्ट्र धुरीण गुंतले आहेत. कुठें कांहीं खुट्ट झालें कीं लोकशाही साठीं बाह्या सरसावून पुढें येणें हा लोकशाही राष्ट्राचा एक उद्योग झाला आहे. स्तुत्य आहे पण लोकशाही काय फक्त राजकारणांतच असूं शकते ? तिला इतरत्र अस्तित्वच नाहीं काय ? राज्यकारभारांत लोकशाही आली कीं राष्ट्र धुरीण थंडगार होऊन स्वस्थ बसतात. व कांहीं वर्षांत त्यांना अनुभव येतो कीं लोकशाहीला सुरूंग लागताहेत, ती डळमळूं पहात आहे. कारण काय ? कारण एकच. सूर्य प्रकाशाप्रमाणें सर्वव्यापी असणारी लोकशाही आम्ही फक्त राजकारणांतच बंदिस्त करून ठेवली आहे. लोकशाहीला शास्त्र पण ती कांहीं शास्त्र नाहीं. तिला तत्व आहे लोकशाहीचें तंत्र यांत आहे. तंत्र आम्ही जाणतों पण त्याची शाही जाणत नाहीं. लोकशाही ही एक जगाकडे, मानवाकडे पहाण्याची दृष्टी आहे. ती एक कृति आहे, लोकशाही राबवायला तशी दृष्टी कमावली पाहिजे. काय खावें, कसें खावें यांच्या उपदेशानें वा अन्न धान्य भरपूर पिकवा अशा घोषणांनीं जसें राष्ट्राचें पोट भरणार नाहीं तसें केवळ लोकशाहीच्या उपदेशाने ती निर्माण होणार नाहीं. अन्न खाऊन पचवून आत्मसात केलें तरच ताकद येते. तद्वत राष्ट्रांतिल हर एक व्यक्तीनें लोकशाही आचरून ती आत्मसात केली तरच टिकावूं व समृद्ध लोकशाही राष्ट्र निर्माण होईल. Democracy is not to be preached but to be practised हें दृष्टी आड केल्यास लोकशाहींतून हुकूमशाही उदयास येण्याचा धोका निर्माण होईल. केवळ राजकारणांत लोकशाही असून भागणार नाहीं. मताधिकाऱ्यांनीं निवडून आलेल्या मंडळींनीं राज्यकारभार हाकला कीं झाली लोकशाही असा भोंगळ समज लोकांचा होऊं देणें योग्य नाहीं. Democracy is to be preached but never to be reached असें आज चाललें आहे. लोकशाही राजकारणाप्रमाणें समाज, धर्म शिक्षण वगैरे सर्व कारणांत असली पाहिजे. ज्याला लोकशाहीची दृष्टि आहे तो कोठेही गेला तरी लोकशाहीच्या दृष्टीनेंच वर्तणार, त्याच दृष्टीनें सर्व व्यवहाराकडे पहाणार, मनाच्या उदार वृत्तीचा ठसा हरएक व्यवहारांत कमी जास्त दिसला नाहीं तर ती उदारवृत्ति कसली ? लोकशाहीचा ठसा राष्ट्रांतील हरएक व्यवहारांत कमी जास्त दिसला नाहीं तर ती खरी लोकशाही होईल काय ! राज्यकारभारांत लोकशाही व सामाजिक धार्मिक व शैक्षणिक संस्थांत हुकुमशाही अशा राष्ट्रीय कडबोळ्याला काय लोकशाही म्हणतां येईल ? आणखी एक गोष्ट ध्यानांत घ्यावी कीं लोकशाही ही हुकूमशाहीच्या अगदीं उलट आहे. अहंकारांतून हुकूमशाही जन्मास येते तर उदारपणांतून मानवतेतून लोकशाही उदयास येते.

मानवांत अहंकार व उदारपणा दोन्ही असली तरी अहंकाराचा वरचष्मा असतो. म्हणून हा मानव अहंकारी आहे. यास्तव लोकशाहीच्या कृष्णास अहंकाराचा कंस सुखासुखी जन्मास देऊं देणार नाहीं हें ओळखून अहंकाराला मुरड घालून उदारवृत्तीला अग्रहक्क देण्याची सवय जोपर्यंत जनतेला झाली नाहीं तोपर्यंत खरी लोकशाही हें स्वप्नच राहील, अहंकार व उदारपणा यांचा योग्य समन्वय करतां आला नाही तर केवळ लोकशाहीने कोणतेही कार्य होणार नाहीं. निर्मळ दुधाप्रमाणें निर्मळ लोकशाही ही केवळ कल्पना आहे. लोकशाहीच्या पक्वान्नांत चवीपुरतें तरी अहंकाराचें मीठ टाकणें भाग आहे. अहंकाराची प्रखर किरणें व उदारपणाचें शीतल चांदणें दोन्हीही जीव धारणेंस जरूर आहेत असें असलें तरी उदारपणाचा मानवतेचा वरचष्मा असला पाहिजे जेथे तेथें आमचा अहंकार पुढे पुढे करतो त्याला मागें रेटून उदारतेला, मानवतेला हरएक व्यवहारांत आपण पुढें केलो पाहिजे. दिलदारपणा, उदारपणा, खेळी मेळी, खिलाडू वृत्ती सहकार्य यांच्या पायावरच लोकशाही चालते, यास्तव या गोष्टी जनतेला शिकविणें, ज्या त्यांच्या अंगवळणी पडतील अशा गोष्टी करणें. हें लोकशाही प्रस्थापित करावयास लागणाऱ्या महत्वाच्या गोष्टीपैकी एक आहे कुटंबाकुटुंबांतून जेव्हां लोकशाहीचे झरे निर्माण होऊन वाहूं लागतील तेव्हां ते एकत्र मिळून राष्ट्रीय लोकशाहीची शीतल सुखजीवन दायी प्रचंड गंगा निर्माण होईल.

## कुटुंबात कसे वागावें ?

पिता वा अन्य कर्ता पुरुष यानें आपला संसार, दैनंदीन व्यवहार लोकशाहीच्या दृष्टीनें चालविले पाहिजेत. कुटुंबप्रमुखानें कुटुंबातील व इतर नातेवाईक मंडळीशी सहकार्यानें वागले पाहिजे. त्यांची मतें, त्यांच्या इच्छा यांना उदाहरपणें दिलदारपणें जरूर तो मान दिला पाहिजे. कुटुंबांतील मंडळी झाली तरी ती माणसेच आहेत हें ओळखून त्यांना त्यांचे माणुसकीचे हक्क भोगूं दिले पाहिजेत. कांहीं करावयाचें असले तर त्याचा विचार सर्वांनीं एकत्र करून एकोप्यानें एकदिलानें व एकमतानें कार्य करावे. घरांत कांहींही असले तरी बाहेर वागताना सर्व कुटुंब म्हणजे जणुं एकच व्यक्ती आहे असें वाटेल अशा तऱ्हेनें वागावे. याप्रमाणें ज्या संसारांत वर्तीले जाते तेथें लोकशाहीची बीजे रुजली जातात. कुटुंब प्रमुखाचें अनुकरण कुटूंबातील इतर मंडळी विशेषतः लहान मुले करीत असतात यामुळे लोकशाहीचा पहिला धडा कुटुंबप्रमुखाने कृतीनें घालून दिला पाहिजे. त्याची छाप इतरांच्यावर पडून संसाराच्या गाडी लोकशाहीच्या चाकावर चालू लागेल. लोकशाहीची तत्वें ही अध्यात्माच्या तत्वाहून फारशी निराळी नसल्या-

# सहानुभूतीचा ओलावा

लेखक—लोकमित्र

सहानुभूति हा एक अमोलिक गुण आहे. त्यामुळें अनेक माणसें प्रेमानें तुमच्याजवळ येतात. तीं तुमचीं होतात. जेथं सहानुभूतीचा ओलावा नाहीं येथें माणुसकीही अनुभवास येणार नाहीं. दुसऱ्याचें दुःख पाहून तुला कसें वाटतें ? असें विचारण्याएवजीं ज्याच्या अंतःकरणांत सहानुभूतीचा ओलावा आहे तो त्या दुःखी माणसाचें दुःख हलकें करण्यासाठीं आपणास जें जें कांहीं करतां येणें शक्य असेल तें तें तो करायला लागेल. दुःखीकष्टी माणसाला त्याचे अनुभव कसले विचारायचे ?

## सहानुभूती सर्वांभूतीं असावी

जो कोणी आपल्या घरांतील मुलांबाळांशीं, पत्नीशीं, भाऊबंदांशीं सहानुभूतीनें व प्रेमळ वागणार नाहीं, ज्याला स्वतःच्या घरातील माणसांबद्दल सहानुभूती वाटत नाहीं तो बाहेरच्या, शेजारच्या किंवा इतर कोणाशींही सहानुभूतीनें वागणें शक्य आहे का ? सहानुभूती घरीदारीं सर्वत्र आढळून आली पाहिजे. सहानुभूतीच्या केवळ गप्पा काय कामाच्या ? ती सक्रीय पाहिजे. दुसऱ्याच्या दुःखपरिहार करणारी पाहिजे.

घरांतल्या माणसांचा काळ आणि बाहेरच्या लोकांवर सहानुभूतीचा सुकाळ काय कामाचा ?

---

मुळें हळूं हळूं प्रगति होऊन संसार व परमार्थ दोन्ही साधले जातील. मी म्हणतो म्हणून ही वृत्ति सांसारिक सुखात व लोकशाहीस मारक आहे तर तुझ्यासाठीं म्हणून ही वृत्ति तारक आहे. तिचा अंगीकार करून कर्त्या पुरुषानें आपला संसार चालवावा. कुटुंब संस्था ही लोकशाहीचा पाळणा आहे. हें विसरूं नका.

लेखमाला या ठिकाणीं संपली. अज्ञानाच्या जंगलांत इतस्तः वाढणाऱ्या वेडयावाकडया झाडावरील रंग व वासरहित अशा या सहा सुमनांचा हार बाबांच्या चरणीं वाहून श्री. चांदोरकरांच्या शब्दांत ती पूर्ण करूं.

ऐसी ऐकोनी समर्थवाणी । चांदोरकर आनंदले मनीं ।
बाबांचे धरिले पाय दोनी । घट्ट मिठी मारोनिया ॥
नयनीं लोटल्या अश्रुधार । रोमांच उठले शरीरा ।
हे साईसमर्थ उदारा । उद्धार माझा केला तूं ॥

संत लीलामृत—दासगणु

या जाणीवेने इमर्सननें एके ठिकाणी म्हटलें आहे कीं, " जा, प्रथम आपल्या मुलांबाळांशीं व घरांतल्या माणसांशीं सहानुभूतिनें व प्रेमानें वागायला शिका. ती तुमची शाळा आहे. आपल्या स्वभावांत बोलण्यांत वागण्यांत गोडवा आणायला शिका सर्वांशीं नम्रतेनें वागण्याचा निर्धार करा.

## काळ बनूं नका

घरातल्या माणसांचें काळ बनूं नका म्हणून सांगितलें याचा अर्थ काय ? पुष्कळ घरांतून असें आढळून येतें कीं, घरातील कर्तासवरता पुरुष असतो तो आपल्याच घमेंडीत असतो. लहान थोर कोणी असो. प्रत्येकावर ताशेरा झाडीत सुटायचें. बस्स दुसरें कांहीं नाहीं ! हा माणूस कधीं एकदां घराबाहेर पडून जातो याची घरांतील लहान थोर सारीं माणसें वाट पहात असतांत ! सहानुभूतिशून्य माणूस कोणालाही नको नकोसा वाटत असतो !

सहानुभूती कोणाबद्दल ? केवळ मानव जातीबद्दल कां ? नाहीं ! सहानुभूती यच्चयावत् प्राणीमात्राबद्दल कीडमुंगी पशुपक्षी या सर्वांबद्दल तीं सारीं ईश्वरानें निर्माण केलेली आहेत त्यानांही तुमची प्रेमाच्या जरुरी आहे.

## व्यक्तित्व खुलविणारी भावना

सहानुभूतीची भावना ही एक अत्यंत कोमल भावना आहे. ती एक दैवी भावना आहे. तुमच्या व्यक्तित्वाला शोभा आणणारी तुमचें व्यक्तित्व खुलविणारी अशी ती सुंदर भावना आहे. त्या भावनेच्या द्वारे दुसऱ्यांच्या अंतरंगांत तुम्हीं प्रवेश करूं शकतां. दुसऱ्यांना आपले करूं शकतां.

दुसऱ्यांच्या दुःखाशीं समरस होणें ही साधी का भावना आहे ? त्यामुळें तुम्हीं त्याचे दुःख निवारण करण्याच्या मार्गाला आपोआप लागतां. सहानुभूतीची भाषा न बोलता समजू शकते. तेथें बोलण्याची जरूरीच नसते. जें कशानेही घडणार नाहीं. तें सहानुभूतिनें घडूं शकते. सहानुभूती हा एक परीस आहे म्हणा ना ! परीस काय करतो ? लोखंडाचेंही सोनें बनवितो ! तीच उपमा सहानुभूतीला देतां येईल. सहानुभूतीचे वर्णन कुठवर करावे ? जगांत जें जे सुंदर, नयन मनोहर व वांछनीय तें सहानुभूतीत आहे. मानवाला देवत्वाप्रत नेऊन पोहोचविण्याचा महान् गुण सहानुभूतींत आहे.

## परकेपणाची भिंत नाहींशी होते

एखादा माणूस परका असतो.त्याचा व आपला कांहीं संबंध पण नसतो सहानुभूतीमुळे जादूची कांडी फिरल्यासारखी स्थिती होती. चमत्कार घडवून आणण्याचें सामर्थ्य त्या दैवी गुणांत आहे. शत्रूला मित्र बनविणारी पशूला माणुसकी आणून देणारी रागाची जागा प्रेमाने भरून काढणारी व तुमच्यात स्थित्यंतर घडवून आणणारी अशी ही जादू आहे

## सर्वांभूती प्रेम भाव

अंतःकरणांत सहानुभूतीचा उदय उगाच होऊं शकत नाहीं. आपल्या सभोवार




## ( नोव्हेंबर १९६४ )

या महिन्यात मागील प्रमाणें भक्तांची गर्दी बरीच होती कांही कलाकारांनी श्री पुढें हजेरी दिली ती.

**कीर्तन**

ह. भ. प. गवई मराठे यांची कीर्तनें नेहमीप्रमाणें झाली. तसेंच श्रीमती. ह. भ. प. कृष्णाबाई येवलेकर यांचें कीर्तन झालें.

**गायन**

श्री. गायनाचार्य सुरेंद्रराव दादर, मुंबई, श्री. यशवंत मुजुमदार मुंबई, श्री. डि. जे. कासड मुंबई, श्री. सौ. शकुंतला जोशी, नाशिक, श्री. शंकरराव कोरगांवकर, सांताक्रूझ मुंबई, श्री. सय्यदभाई वरोडावाला ( बडोदा ), श्री. लक्ष्मणराव बेडेकर

---

वावरणारीं सारी माणसें आपली आहेत. आम्ही सर्व बंधु भावाच्या नात्यानें बांधलेले आहोंत, अशी भावना तुमच्या अंतःकरणांत उदय पावेल तेव्हांच दुसऱ्याबद्दल सहानुभूती तुमच्या अंतःकरणांत निमार्ण होईल.

रोजच्या व्यवहारांने अत्यंत तारक ठरणारा असा हा सद्गुण आहे. कठोर कांहीं काम करूं शकत नाहीं. तुमच्या वाऱ्यालाही कोणी उभा रहणार नाहीं. लोकसंग्रह करणें मित्रपरिवार वाढविणे व सर्वांशीं प्रेमानें बांधेल जाणें या गुणांना जगांत भारी मोल आहे. सनुभूतीच्या बलावर तुम्ही तें साधवू शकाल.

आजकाल लहानापासून थोरांपर्यंत सर्वांना तुमच्या सहानुभूतीच्या ओलाव्याची फार जरूर आहे. जग तुमच्या सहानुभूतीसाठीं तहानेलेले आहे. हात न आखडतां रिक्त हातांनीं सहानुभूतीची सर्वांठायी खैरात करा. तुमचें जीवन त्यामुळें देदिप्यमान होईल.

---

गोंदिया जि. भंडारा, श्री. विमलबाई भाऊसाहेब राजेशिर्के जळगांव, श्री. मधुकर मनोहर सोरे मुंबई, कु. अरुणा प्रधान अ. नगर, सौ. सुनंदा प्रधान अ. नगर श्री. जयसेन यशवंतराव कोठारी मुंबई, श्री. विठ्ठल विष्णु मांजरेकर शिर्डी, श्री. विश्वनाथबुवा थोरात बीड (मराठवाडा), श्री. अंबीमग केताजी धुळे,

**कार्तिकी महाएकादशी**

श्रींचे समाधीस मंगलस्नान कीर्तन व गावांतून पालखीची मिरणूक, टाळ मृदंग भजनगारुड वगैरे कार्यक्रम झाले.

**दिपवाळी**

श्रीलक्ष्मी सरस्वती पूजन सालाबादप्रमाणें मोठ्या थाटांत संस्थान पुजारी दिगंबर भटजी यांचे हस्ते झालें. दिव्यांची रोषणाई व शोभेची दारु, फटाके वगैरे उडविणें झाले.

**तुलसी विवाह**

श्रींचे द्वारकाईतील तुळशी विवाह व कै. दिक्षीतवाडा तुळशी विवाह सालाबाद प्रमाणें थाटांत झाले.

**नवल विशेष**

माजी माननीय कोर्ट रिसीव्हर दर्पसाहेब यांना निरोप देण्याचा समारंभ माननीय कोर्ट रिसीव्हर पोतनीस साहेब यांचे हस्तें संस्थान सर्वनोकर सेवेकरी निमंत्रित प्रतिष्ठित मंडळी यांचे समवेत होऊन आभार व हार तुरे, चहा फलाहार फोटो असा कार्यक्रम झाला.

**Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi**

**श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित्र | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ७–०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४–५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ३–७५ |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४–०० |
| (५) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३–०० |
| (६) | **Glimpes of Indian Spirituality**– | | by Pradhan | १–०० |
| (७) | **Glimpes of Indian Spirituality** | (Telgu) | | १–०० |
| (८) | श्री साईलीलामृत | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २–०० |
| (९) | ,, | (हिंदी) | श्री. चिटणीस–दिल्ली | २–५० |
| (१०) | साईबाबा–अवतार व कार्य | (मराठी) | श्री. धोंड | २–०० |
| (११) | साईबाबांचे ४ अध्याय | (मराठी) | श्री. दासगणू | ००–५० |
| (१२) | सगुणोपासना | (मराठी) | श्री. भीष्म | ००–२५ |
| (१३) | ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००–२५ |
| (१४) | श्री रुद्राध्याय ११ वा | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००–१२ |
| (१५) | स्तवन–मंजरी | (मराठी) | श्री. दासगणू | ००–१३ |
| (१६) | श्री साई-सुमनांजली | (मराठी १०८ नांवें) | | ००–०६ |
| (१७) | कीर्तन पंचक | (मराठी) | श्री. देव | १–५० |
| (१८) | शीलधी | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००–७५ |
| (१९) | श्री साईगीतांजलि | (मराठी) | कवि श्रीपाद | ००–१२ |
| (२०) | **Spiritual Symphony** | | by R. S. Harshid Mehta | २–५० |
| (२१) | **Side lights on Sai Baba** | (Eng.) | Calcutta | ००–७५ |
| (२२) | **Guide to Shirdi** | (English) | | ००–१२ |
| (२३) | स्तवनमंजिरी व सुमनांजली | (मराठी) | | ००–२० |

**Colour pictures of Sai Baba by Neroy**

| | | |
|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone 15" × 20" Thick | 1–00 |
| (2) | ,, ,, ,, 9½" × 13½" medium | 00–37 |
| (3) | ,, ,, in Dwarkamai 9½" × 13½" medium | 00–50 |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 37 nP. for No. 1 Postage Extra ( minimum purchase of Rs. 15 ). *Can be had from* (मागवा) :

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi. Dst. Ahmednagar.
2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.

मालक : **श्री साईबाबा संस्थान, शिरडी,** आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां
प्रकाशक : बी. जी. पोतनीस, मुंबई १४.



★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते. त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते!

★


आ णि म्ह णू न च
हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स,
ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि
आणि त्याचप्रमाणें वैशिष्ट्यपूर्ण
सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५३४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई
टेलिफोन : ७५०४७


डी. डी. नेरॉय यांनीं खास तयार केलेले श्री साईबाबांचीं तीन रंगी चित्रें, द्वारकामाई व दगडावर बसलेले — साईज ६ × ८, १० × १४, १४ × २० खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

**श्री साईबाबा संस्थान**

मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर व

**साईनिकेतन**, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.


मुद्रक : **श. कृ. सापळे**, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशक : **बी. जी. पोतनीस**, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी. दादर. मुंबई १४